कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
JUSTICE FOR ALL ADVO CATE
संपर्क
ॲड . सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३०४५१

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

रविवार २८ जून २०२६ | वर्ष : ६ | अंक : १७८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Sunday, 28 June 2026 | Year : 6 | Issue : 178 | Daily | Rate: Rs. 5/-

**दि. २८ जून 2026**



१९२२- लंडनच्या ग्रेज -इन या संस्थेच्या न्यायसभेने डॉ.आंबेडकरांना बार-अॅट-लॉ(बॅरिस्टर) ही पदवी प्रदान केली.

१९२९- मुंबई येथील महार जातीतील पहिल्या अपूर्व वैदीक विवाहास डॉ बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई उपस्थित होते.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

## टीईटीचा पेपर फुटला; आजची होणारी परीक्षा रद्द




**ठाणे :** शिक्षण विभागातून एक मोठी बातमी समोर आली आहे. परीक्षा पद्धती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. टीईटीचा पेपर फुटल्याची माहिती समोर आली आहे. या पेपरफुटीच्या भीतीमुळे प्रशासनाने २८ जून २०२६ रोजी होणारी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) रद्द केली आहे. ठाणे परिसरातून प्रश्नपत्रिका फुटल्याची माहिती संबंधित विभागापर्यंत पोहोचली. यानंतर प्रशासनाने २८ जून रोजी होणारी परीक्षा रद्द केली.

शिक्षण विभागाच्या निर्णयामुळे राज्यभरातील मोठ्या संख्येने उमेदवारांना धक्का बसला आहे. अनेक जण बऱ्याच काळापासून परीक्षेची तयारी करत होते आणि परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी आधीच तयार होते. या अचानक घेतलेल्या निर्णयामुळे उमेदवारांमध्ये निराशा पसरली आहे.

पेपरफुटीच्या बातमीनंतर, प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी सुरू केली असून, पेपरफुटी कशी झाली आणि त्यामागे कोण आहे याचा तपास केला जात आहे. उमेदवार आता परीक्षेच्या नवीन तारखेच्या घोषणेची वाट पाहत आहेत.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने प्रसिद्ध केलेल्या जाहीर निवेदनानुसार, २८ जून २०२६ रोजी राज्यातील एकूण १०२८ केंद्रांवर ही परीक्षा होणार होती. नीट (NEET) २०२६ परीक्षेमधील गैरप्रकार लक्षात घेता या परीक्षेसाठी कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती.

परंतु, आज २७ जून २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे भिवंडी पोलिसांनी काही संशयित इसमांवर धाड टाकली. या इसमांकडे टीईटी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबद्दल माहिती असल्याचे समोर आले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना तातडीने पडताळणीसाठी बोलवण्यात आले. पडताळणी दरम्यान, संशयितांकडे सापडलेले प्रश्न आणि टीईटी जून २०२६ च्या मूळ प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न तंतोतंत समान असल्याचे आढळून आले. या गंभीर प्रकारानंतर भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

प्रश्नपत्रिका लीक झाल्याचे प्राथमिक तपासणीत स्पष्ट झाल्यानंतर, परीक्षेची गोपनीयता आणि पारदर्शकता अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने २८ जून रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा पूर्ण पारदर्शक पद्धतीनेच व्हावी, असा परीक्षा परिषदेचा आग्रह असून या प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे असल्याचे परिपत्रकात म्हटले आहे.

### दीड कोटी रुपयांत विकला जाणार होता TET परीक्षेचा पेपर; तीन आरोपी ताब्यात

टीईटी परीक्षेचा पेपर तब्बल दीड कोटी रुपयांना विकला जाणार होता, अशी धक्कादायक माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक दुधे यांनी भिवंडी येथे पत्रकार परिषदेत दिली. या प्रकरणी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना भिवंडीतील कोनगाव परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे.

अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक दुधे यांनी सांगितले की, ताब्यात घेण्यात आलेल्या तीन आरोपींपैकी एक आरोपी हरियाणाचा तर दोन आरोपी बिहारचे रहिवासी आहेत. हे तिघेही दिल्लीहून महाराष्ट्रात आले होते. प्राथमिक तपासात त्यांनी टीईटीची प्रश्नपत्रिका विक्रीसाठी आणल्याचे समोर आले असून, त्यासाठी दीड कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. मात्र हा व्यवहार पूर्ण होण्यापूर्वीच पोलिसांनी कारवाई करत आरोपींना जेरबंद केले. या कारवाईदरम्यान संशयितांकडून प्रश्नपत्रिकेशी संबंधित कागदपत्रे आणि साहित्य जप्त करण्यात आले आहे. प्रश्नपत्रिका नेमकी कुठून मिळाली, ती कोणाकडून आरोपींपर्यंत पोहोचली आणि ती नेमकी कोणाला विकली जाणार होती, याचा सध्या सखोल तपास सुरू असल्याचे दुधे यांनी सांगितले.

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी २० पोलिस कर्मचाऱ्यांचे विशेष तपास पथक नियुक्त करण्यात आले असून, विविध राज्यांमध्ये तपासासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू असून, तो हाती लागल्यानंतर संपूर्ण रॅकेटचा उलगडा होईल, असे पोलिसांनी सांगितले आहे.

याशिवाय आरोपींचे कोचिंग क्लासेस, परीक्षा एजंट किंवा इतर कोणत्याही रॅकेटशी संबंध आहेत का, याचाही तपास सुरू आहे. प्रश्नपत्रिका आणखी कुठे पोहोचली आहे का, किती उमेदवारांपर्यंत ती पोहोचली आणि या कटात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेला भिवंडी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न आरोपींकडे असलेल्या मजकुराशी जुळत असल्याचे प्राथमिक पडताळणीत समोर आले. त्यानंतर परीक्षेची पारदर्शकता कायम राखण्यासाठी २८ जूनची टीईटी परीक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. नीट पेपरफुटी प्रकरणानंतरही परीक्षा सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आता टीईटी पेपरफुटीमुळे राज्यातील परीक्षा व्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणामागील संपूर्ण रॅकेट उघडकीस आणण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून, येत्या काही दिवसांत आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## भारत-बांगलादेश सीमेवर 'पुशबॅक'वरून BSF आणि BGB आमनेसामने




**नवी दिल्ली:** आसामच्या श्रीभूमी जिल्ह्यातील भारत-बांगलादेश सीमेवर पुशबॅकवरून जबरदस्त तणाव निर्माण झाला आहे. कथित स्वरूपात काही लोकांना परत पाठवण्याच्या (पुशबॅक) प्रयत्नावरून 'बॉर्डर सिक्युरिटी फोर्स' (BSF) आणि 'बॉर्डर गार्ड बांगलादेश' (BGB) आमनेसामने आले. मिळालेल्या माहितीनुसार, बीजीबीने भारताच्या दिशेने बंदुका ताणल्या, तसेच डझनावारी बांगलादेशी हातात शस्त्रे आणि काठ्या आदी घेऊन बॉर्डरवर दमले. दरम्यान बीएसएफला धमक्याही देण्यात आल्या. हा संपूर्ण प्रकार बिलबारी सीमावर्ती भागात घडला. परिसरात अद्यापही तणाव कायम आहे.

ही घटना बिलबारी सीमावर्ती भागात घडली. बांगलादेशी नागरिकांच्या एका गटाला सीमेपलीकडील बांगलादेशच्या भागातील न्यू पल्लाथलच्या दिशेने ढकलण्यात येत होते. तेव्हा हा वाद झाला. बीजीबीने यावर तीव्र आक्षेप घेत या गटाला आपल्या हद्दीत घेण्यास नकार दिला. ही बातमी पसरताच सीमावर्ती गावांमधील बांगलादेशी नागरिक चाकू, लाठ्या आणि बांबूचे दंड घेऊन बीजीबीच्या समर्थनार्थ झिरो लाईनवर जमा झाले. त्यांनी भारतीय सीमेच्या दिशेने शस्त्रे ही दाखवले.

याशिवाय, बीजीबीच्या पल्लाथल आऊटपोस्टच्या जवानांनी लाऊडस्पीकरच्या सहाय्याने बीएसएफला वारंवार मागे हटण्यास सांगितले. तसेच, परिस्थिती बिघडल्यास गोळीबार करावा लागेल, असा इशाराही दिला. काही तास चाललेल्या या वादानंतर, दोन्ही बाजूचे सैनिक तैनात होते. मात्र कोणतीही जीवितहानी किंवा गोळीबार झालेल्याचे वृत्त नाही.

बीएसएफच्या जवानांनी प्रचंड संयम बाळगला आणि परिस्थिती नियंत्रणात ठेवली. या नंतर दोन्ही बाजूंनी अतिरिक्त कुमक पाठवण्यात आली असून आसाम पोलीस आणि स्थानिक प्रशासनाला अलर्ट करण्यात आले आहे. या घटनेवर अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य समोर आलेले नाही.

## महत्वाच्या बातम्या

### देशभरात सुमारे सहा कोटी मतदारांची नावे वगळली



**नवी दिल्ली :** मतदारयाद्यांच्या विशेष पुनरावलोकन मोहिमेला (एसआयआर) प्रारंभ होऊन एक वर्ष पूर्ण झाले. या कालावधीत निवडणूक आयोगाने सदर उपक्रमाद्वारे देशभरात सुमारे सहा कोटी नावे मतदार यादीतून वगळली आहेत. या प्रक्रियेमुळे विरोधक आणि निवडणूक आयोग यांच्यात तीव्र वाद निर्माण झाला असला, तरी आयोगाने मतदारयादीतील त्रुटी दूर करण्याची मोहीम १९ राज्ये, केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू ठेवली आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी प्रायोगिक तत्त्वावर ही मोहीम सुरू झाली होती. त्यानंतर ६५ लाख नावे वगळण्यात आली. कागदपत्रांच्या नावाखाली नागरिकांना मतदानापासून वंचित ठेवल्याचा आरोप विरोधकांनी केला. मात्र, एसआयआरची घटनात्मक वैधता सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवली.

एसआयआरवरील मजकुराचा समावेश एनसीईआरटीच्या नववीच्या समाजशास्त्र पुस्तकात केला आहे. पात्र मतदार वगळला जाणार नाही. अपात्र व्यक्तीचा समावेश होणार नाही, यासाठी ही प्रक्रिया असल्याचे नमूद आहे.

### अयोध्येतील राम मंदिराच्या देणगीवर डल्ला, 8 जण अटकेत

**अयोध्या :** अयोध्येतील राम मंदिरात भाविकांकडून मिळालेल्या देणगीच्या अपहार प्रकरणात आठ जणांना अटक करण्यात आली असून, त्यांना २९ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तपासादरम्यान आतापर्यंत ७९.८५ लाख रुपये जप्त करण्यात आल्याची माहिती सरकारी पक्षाने न्यायालयात दिली.

पोलिसांनी अद्याप आरोपींच्या पोलीस कोठडीची मागणी केलेली नसून, सोमवारी त्यांना पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे. त्यावेळी पोलिसांकडून पोलीस कोठडीची मागणी केली जाऊ शकते. या प्रकरणात श्री राम जन्मभूमी तीर्थ ट्रस्टचे महासचिव चंपत राय व विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांनी राजीनामा दिल्याचे बोलले जाते. अटकेतील पाच ते सहा जण बँक कर्मचारी आहेत. ते मंदिरातील दान रक्कम मोजण्याच्या कामावर नियुक्त होते. मंदिरातल्या बाथरूममध्ये नोटांची बंडले लपवून नंतर ते गायब करायचे. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने याबाबत पोलिसांत तक्रार दाखल केली होती. त्यानुसार, राज्य सरकारने विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करून या प्रकरणी तपास सोपवला होता. या पथकात लखनौ विभागीय आयुक्त विजय विश्वास पंत, पोलिस महानिरीक्षक किरण एस आणि वित्त विभागाचे विशेष सचिव नील रतन यांचा समावेश आहे.

### गाझा प्रश्नावर मोदी सरकारचे मौन राष्ट्रीय हिताच्या विरोधात



**नवी दिल्ली :** काँग्रेस संसदीय दलाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी गाझामधील इस्रायलच्या लष्करी कारवाईवर 'मौन आणि निष्क्रियता' बाळगल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. भारताची ही भूमिका देशाची 'नैतिकता' आणि 'राष्ट्रीय हित' या दोन्हीच्या विरोधात आहे, असा युक्तिवाद त्यांनी केला आहे.

एका लेखात सोनिया गांधी यांनी लिहिले आहे की, इस्रायलने गाझामध्ये घडवून आणलेला विनाश आणि त्यामागील त्यांचा हेतू स्पष्टपणे दिसून येत आहे. गाझामध्ये लहान मुलांचा मृत्यू आणि त्यांना झालेली दुखापत ही केवळ एक घटना नसून, तो एका जाणीवपूर्वक आखलेल्या रणनीतीचा भाग आहे. शाळा आणि रुग्णालये उद्ध्वस्त झाल्यामुळे तिथले मानवतावादी संकट अधिकच गडद झाले आहे.

सोनिया गांधी म्हणाल्या की, ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्रायलवर केलेला हल्ला अत्यंत निंदनीय आणि पूर्णपणे अमान्य होता, परंतु त्यानंतर इस्रायलने केलेली लष्करी कारवाई अत्यंत क्रूर आणि अमानुष आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गाझाला 'पूर्णपणे वेढण्याचे' आणि 'नष्ट करण्याचे' आवाहन केले होते, ज्यातून त्यांचा हेतू स्पष्ट होतो. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भूमिकेवरही त्यांनी टीका केली असून अमेरिकेच्या पाठिंब्यामुळेच इस्रायल ही कारवाई करू शकला, असे त्या म्हणाल्या.

## होर्मुझच्या सामुद्रधुनीत पुन्हा युद्ध पेटले



**नवी दिल्ली:** इराण आणि अमेरिका यांच्यात झालेला युद्धबंदीचा करार अवघ्या नऊ दिवसांतच मोडीत निघण्याची चिन्हे आहेत. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या एका व्यापारी जहाजावर इराणने ड्रोन हल्ला केल्यानंतर, अमेरिकेने शुक्रवारी इराणच्या लष्करी तळांवर आणि रडार केंद्रांवर जोरदार हवाई हल्ले केले. या कारवाईमुळे पर्शियन आखातातील तणाव पुन्हा एकदा टोकाला पोहोचला आहे.

२५ जून रोजी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून ओमानच्या किनारपट्टीवरून प्रवास करणाऱ्या 'एम/व्ही एव्हर लव्हली' या सिंगापूरचे ध्वज असलेल्या व्यापारी जहाजावर इराणने आत्मघातकी ड्रोनद्वारे हल्ला केला. इराणने एकूण चार ड्रोन डागले होते, त्यापैकी तीन ड्रोन अमेरिकेने हवेतच पाडले, तर एका ड्रोनचा फटका जहाजाच्या वरच्या भागाला बसला. सुदैवाने, या हल्ल्यात जहाजावरील कोणत्याही कर्मचाऱ्याला दुखापत झाली नाही आणि जहाजाचे इंजिन व नौकानयन यंत्रणा सुरक्षित राहिली.

या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकन सेंट्रल कमांडने २६ जून रोजी इराणवर ९० मिनिटे मोठी लष्करी कारवाई केली. अमेरिकेच्या एफ-३५ आणि एफ-१६ लढाऊ विमानांनी इराणच्या किनारपट्टीवरील तीन आणि 'केशम' बेटावरील एका ठिकाणासह एकूण चार लष्करी तळांना लक्ष्य केले. यामध्ये इराणचे क्षेपणास्त्र साठे, ड्रोन केंद्रे आणि किनारपट्टीवरील रडार यंत्रणा उद्ध्वस्त करण्यात आल्या.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर लिहिले की, "इराणने केलेला हा हल्ला युद्धबंदी कराराचे स्पष्ट उल्लंघन आहे. त्यांना याचे परिणाम भोगावे लागतील."

## राज्यातील १२ दुय्यम निबंधक कार्यालये संशयाच्या भोवऱ्यात



**कोल्हापूर :** लोकांची सोय व्हावी म्हणून राज्य शासनाने गतवर्षी मेमध्ये सुरू केलेल्या 'एक जिल्हा, एक नोंदणी' धोरणाचा आधार घेऊन मुद्रांक शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी कागदपत्रांची फारशी छाननी न करताच दस्तनोंदणीचा धडाका लावल्याचे चित्र पुढे आले आहे. राज्यात अशी १२ दुय्यम निबंधक कार्यालये आहेत की, तिथे असे व्यवहार मोठ्या प्रमाणावर झाले आहेत. त्याची स्वतंत्र पथके नेमून नोंदणी महानिरीक्षकांनी तपासणी सुरू केली आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी विधानसभेत मुद्रांक शुल्कमधील घोटाळ्याच्या चौकशीची घोषणा केली आहे. त्यांनीच लोकांची सोय व्हावी म्हणून हे धोरण सुरू केले; परंतु अधिकाऱ्यांनी त्यातून सरकारचे नव्हे, तर स्वतःचेच खिसे भरण्याचे काम केल्याचे पुढे आले आहे. या धोरणात मालमत्ता ज्या दुय्यम निबंधक कार्यालयाच्या हद्दीत आहे, त्याच कार्यालयात जाण्याची अट रद्द केली. प्रत्येक जिल्ह्यात नियमांना बगल व आर्थिक व्यवहार करून दस्त नोंदणी करून देणारे काही अधिकारी होते. त्यांनी या संधीचे सोने केले. पुणे जिल्ह्यातील हवेली ४ या कार्यालयात २०२५ मध्ये ३००३ दस्त झाले होते. त्याच कार्यालयात राज्यात सर्वाधिक ५०८० दस्त नोंदणी या धोरणानुसार झाली. पन्हाळा या दुर्गम तालुक्यात २०२५ मध्ये २१५९ दस्त झाले होते, तिथे ४३४३ दस्तांची नोंदणी झाली.

## सभापती शिवानी दाणींनी मांडला नागपूर महापालिकेचा ६२०२ कोटींचा संकल्प



**नागपूर :** महापालिकेच्या स्थायी समितीचा बहुप्रतिक्षित अर्थसंकल्प शनिवारी सभापती शिवानी दाणी यांनी सादर केला. त्यांनी ६२०२ कोटींचा अर्थसंकल्प मांडत शहराच्या सर्वांगिण विकासासोबत डकटिंग पॉलिसीअंतर्गत उत्पन्न वाढीवरही भर दिला. अर्थसंकल्प मांडणाऱ्या त्या गेल्या २० वर्षांतील पहिल्या महिला सभापती ठरल्या. यापूर्वी २००६ मध्ये २००६-०७ या वर्षासाठी नंदिनी हाडके यांनी अर्थसंकल्प सादर केला. स्थायी समिती सभापती शिवाणी दाणी शहराला काय देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यांनी आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, पथदिवे यासाठी एकूण ६२०२. ४८ कोटींच्या अंदाजपत्रकातून नागपूरकरांचे जीवन सुसह्य करण्याचा संकल्प केला. सत्ताधाऱ्यांचा अर्थसंकल्प पाच वर्षांनी सादर करण्यात आला.

सभापती शिवानी दाणी यांनी १९ मे रोजी अर्थसंकल्प सादर करण्याची तयार केली होती. परंतु १८ मे रोजी निवडणुकीची घोषणा झाली. त्यामुळे महापौर नीता ठाकरे यांनी अर्थसंकल्पासाठी आयोजित विशेष सभा अर्थसंकल्प न मांडताच अनिश्चित काळासाठी तहकूब केली होती. ही सभा आज, शनिवारी सुरेश भट सभागृहात पार पडली. सभागृहात नगरसेवकांना ओळखपत्र बघून प्रवेश देण्यात आला होता. दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांनी ५८४० कोटी ६५ लाख रुपयांचा अर्थसंकल्प स्थायी समितीला सादर केला होता. यात सुधारणा करीत २०२६-२७ या वर्षासाठी शिवानी दाणी यांनी आज अर्थसंकल्प सादर केला.

पाच वर्षापूर्वी तत्कालीन स्थायी समिती सभापती प्रकाश भोयर यांनी २०२१ मध्ये २०२१-२२ या वर्षासाठी अर्थसंकल्प सादर केला होता, त्यानंतर २०२२ मध्ये महापालिकेत प्रशासकराज आले. तेव्हापासून २०२५ पर्यंत आयुक्तच अर्थसंकल्प सादर करीत होते. यावेळी स्थायी समिती सभापती शिवानी दाणी अर्थसंकल्प सादर केला. त्यांच्या अर्थसंकल्पाकडे नागपूरकरांसह अधिकारी, कर्मचाऱ्यांचेही लक्ष लागले होते. दाणी यांचा अर्थशास्त्र हा आवडता विषय आहे. त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी तसेच अपेक्षित उत्पन्नातून शहराचा विकास साध्य करण्याची कसरत त्यांना करावी लागणार आहे.

## ICGS Akshay भारतीय तटरक्षक दलाच्या सेवेत




**वास्को :** गोवा शिपयार्ड लिमिटेडने भारतीय तटरक्षक दलासाठी स्वदेशी तंत्रज्ञानाच्या आधारे बांधलेली नव्या पिढीतील Fast Patrol Vessel (FPV) 'ICGS Akshay' शनिवारी (२७ जून) अधिकृतपणे भारतीय तटरक्षक दलाच्या सेवेत दाखल झाली. या जहाजाच्या अनावरणाचा समारंभ वित्त मंत्रालयाच्या खर्च विभागाच्या अतिरिक्त सचिव परमा सेन यांच्या हस्ते पार पडला.

गोवा शिपयार्डमध्ये आयोजित कार्यक्रमाला पश्चिम विभागाचे तटरक्षक कमांडर महानिरीक्षक भीषम शर्मा, उपमहानिदेशक महानिरीक्षक ज्योतिंद्र सिंह, केंद्र व राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी तसेच गोवा शिपयार्ड लिमिटेडचे प्रतिनिधी उपस्थित होते. 'ICGS Akshay' ही नौका भारतीय तटरक्षक दलाच्या सागरी सुरक्षा, राष्ट्रहिताचे संरक्षण आणि अथक सेवाभावाचे प्रतीक मानली जात आहे. सुरक्षित, संरक्षित आणि स्वच्छ समुद्र राखण्याच्या तटरक्षक दलाच्या वचनबद्धतेला ही नौका अधिक बळ देणार आहे.

गोवा शिपयार्ड लिमिटेडने पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून या नौकेची रचना आणि बांधणी केली आहे. त्यामुळे 'आत्मनिर्भर भारत' आणि 'Make in India' उपक्रमांना आणखी चालना मिळाली असून देशाच्या स्वदेशी जहाजबांधणी क्षमतेचे हे महत्त्वपूर्ण उदाहरण ठरले आहे. 'ICGS Akshay' भारतीय तटरक्षक दलाच्या विविध जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडणार आहे. यामध्ये सागरी कायद्याची अंमलबजावणी, शोध व बचाव (Search and Rescue) मोहिमा, किनारी सुरक्षा, सागरी पर्यावरण संरक्षण तसेच समुद्रात संकटात सापडलेल्या नागरिकांना मदत करणे यांचा समावेश आहे.

कमांडंट दीपक चौबे यांच्या नेतृत्वाखाली 'ICGS Akshay' आणि तिचा कर्मचारीवर्ग भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात सामील झाला असून व्यावसायिकता, सतर्कता आणि राष्ट्रसेवेची गौरवशाली परंपरा अधिक बळकट करण्याचे कार्य करणार आहे. 'ICGS Akshay'च्या सेवाप्रवेशामुळे भारतीय तटरक्षक दलाच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

## केंद्रीय कृषी मंत्र्याला काकडीच्या शेतीसाठी ९९ लाखांचं सरकारी अनुदान?



**नवी दिल्ली:** केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचे राज्यमंत्री भागीरथ चौधरी सध्या एका मोठ्या वादात सापडले आहेत. राजस्थानमधील त्यांच्या खासगी शेतात काकडीच्या व्यावसायिक शेतीसाठी त्यांना सुमारे १ कोटी सरकारी अनुदान मिळाले आहे. धक्कादायक म्हणजे, हे अनुदान त्यांना स्वतःच्याकडे असणाऱ्या कृषी मंत्रालयाच्या 'राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून' मिळाले आहे. विशेष म्हणजे, भागीरथ चौधरी हे स्वतः या फलोत्पादन मंडळाचे पदसिद्ध उपाध्यक्ष आहेत.

एका खासगी वृत्तवाहिनीने केलेल्या तपासणीत हा प्रकार समोर आला आहे. मंत्र्यांच्या शेताबाहेर लागलेल्या सरकारी बोर्डावर "राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ, कृषी मंत्रालय, भारत सरकार तर्फे सहाय्य" असे लिहिले आहे. तसेच लाभार्थी म्हणून "श्री भागीरथ चौधरी" आणि अनुदानाची रक्कम "५०% म्हणजे रू ९९,६०,०००" अशी स्पष्ट नोंद आहे. मात्र, हा लाभार्थी देशाचे कृषी राज्यमंत्री आहेत, याचा उल्लेख या बोर्डावर कुठेही नाही.

या काकडी शेती प्रकल्पाचा एकूण खर्च १ कोटी ९९ लाख रुपये आहे. यासाठी मंत्री महोदयांनी स्वतः ४९ लाख ८० हजारांची गुंतवणूक केली, तर उर्वरित १ कोटी ४९ लाख रुपयांचे कर्ज 'HDFC बँके'कडून घेतले होते. चौधरी यांनी १५ एप्रिल २०२५ रोजी या अनुदानासाठी अर्ज केला होता. आश्चर्य म्हणजे, केवळ १४ दिवसांनंतर २९ एप्रिल २०२५ रोजी त्यांच्या अर्जाला प्राथमिक मंजुरी मिळाली. मार्च २०२६ मध्ये या प्रकल्पाला अंतिम मंजुरी मिळाली आणि ३० मार्च २०२६ रोजी ९९ लाख ३ हजार रुपयांचे अनुदान थेट त्यांच्या बँकेच्या कर्ज खात्यात जमा देखील झाले.



28 June 2026 page 02_Layout 1 6/27/2026 5:02 PM Page 1



# आंबेडकरी कव्वाली




**कोण राखील आता भीमाचा मळा**
**वाळुनी चालला हा उभा जोंधळा....**

**वामन दादाच्या या ओळी खुप काही सांगून जातात. आंबेडकरी कव्वालानीच भिमाच्या या मळ्याला आग लावली, काही मळ्यात बसुन हात शेकत आहेत तर काही हा मळा आगी पासुन वाचवत आहे. सोन्यासारखे पिक ज्या मळ्यात आहे तोच मळा कापण्याचे षडयंत्र सुरू आहे. सारा माल कसा करपुन गेला. आज या मळ्याचा मालक स्वतः लुळा पांगळा झाला आहे.**

**भीम माझ्या मधी होता मान ताठ होती माझी ।**
**आज माझ्यातला भीम मीच उणा केला. आता दोष देवु कुणा ।**

हा प्रश्न मला सतत पडतो तरीही मी हरलो आहे असे नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होवुन, ज्यां गायक, कव्वांलाचा जन्म झाला. ज्यांच्या त्यागातून, परिश्रमातून जलसेकार जन्माला आले. त्यानी कधीच भीम उणा केला नाही। मात्र आज वर्तमानात भीम उणा करून गाढवाच्या पंक्तीत बसुन पूर्वजांच्या या लोककलेला काही मस्तावलेले गोंधळी नख लावण्याचे प्रयत्न करत आहे. ज्यांची गुरु बनण्याची पात्रता नाही असे गायक कव्वाल दोनचार गायक पकडून] 'मले गुरु मना बे! पाया पडायचा कार्यक्रम आयोजित करतात. तुमचा सर्वांचा गुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. त्यांनी तुम्हाला बळ दिले. नाही तर हा समाज तुम्हाले जवळ तरी उभा ठेवता? गुरु तथागत बुद्धासारखा असावा, गुरु महात्मा फुल्यासारखा असावा, गुरु वामनदादा सारखा असावा, अश्या गुरु पंरपरा असाव्यात.

**'तू मले शाल दे, मी तुले शार्गिर्द**
**म्हणून मान्यता देतो.'**

खरे म्हणजे आपण या कलेचा अपमान करीत आहे. वामनदादा गुरु झाला. त्यांच्यावर लोकांनी खंड काढले, विद्यापिठात मुल-मुली पी. एच डी. करतात. आज त्यांचे गीत अभ्यासाचा विषय झाले. आज वामनदादा सारखे लिखाण कुणी करताना दिसत नाही. मनोजराजा वर्तमानात ती जबाबदारी पार पाडत आहे. त्यांच्या लेखणीची कमालच आहे. त्यांचा अभ्यास, त्यांची दृष्टी, समाजाकडे बघण्याची तीक्ष्ण नजर समाजमन कसे आहे. काय पाहिजे त्यांना, याची सांगड घालून ते गित शाहीरी लिहीतात आणि काही नवशिखे त्यांची शाहीरी तोडून-मोडून आपल्या नावावर खपवतात, हे शल्य गायकाच्या मनात असतेच आणि इथेच त्याच्या कलेचा सांस्कृतिक मृत्यू होतो. छोटे बाबुसारखा शायर गितकार, कव्वाल त्यांच्या सोबत हेच घडले. ते म्हणतात,

**'छोटे को गिराओना नजरो से बडे लोगो ।**
**हिरे भी निकलते है गिट्टी के खदानोमे ।'**

तरीही आपण त्यांना मान सन्मान देऊ शकलो नाही. इमानाला जागणारे हे गायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे गाठोडे घेवून फिरणारे व जनमाणसात क्रांतीचे रणशिंग फुंकणारे यांना गुरुत्व देण्याची आपली दानत नाही. गायक गीतकारांना असे अनुलेखाने मारु नका, ज्यांचा जो सन्मान आहे तो त्यांना दिला तर तुमची उंची त्यांच्यापेक्षाही श्रेष्ठ होवू शकते, परंतु या उंचीचा माणूस सापडतच नाही. म्हणून खेदाने मनोजराजा म्हणतो,

**'कुणा म्हणु शत्रू । कुणा म्हणू आपल्या ।**
**काळजाच्या माणसाने काळजाला कापले।**
**माणसाच्या काळाजाने माणसाला कापले'।**

हे चित्र आज आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीचे झाले आहे. सर्व सांस्कृतिक चळवळीत भेसळ निर्माण झाली. असाच एक प्रयत्न अनिरुद्ध वनकर यांनी केला. तेव्हा गितकार गझलकार भाऊ पंचभाई यांनी न सांगता गीत म्हटल्यामुळे यांच्या विरोधात खटला दाखल केला. मग गितकारानी अशी भूमिका घेतली तर तिकडुनही समाज दूषने लावतो. परंतु गितकारानी आपल्या मेहनतीचा हरजाना घेतलाच पाहिजे. किंवा गायकांनी त्यांना दिलाच पाहिजे. तरच दोघेही सन्मानाने जगतील कुणावरही अन्याय होणार नाही. यांची काळजी घेणे आजच्या स्वतः विषेशण लावलेल्या प्रबोधनकारांनी विशेष लक्ष दिले पाहिजे. नाही तर वामनदादा म्हणतात,

**'गोडी होती मधाची मला जोवरी**
**लाख लटकून होते, मोहळापरी।'**

संपता अर्क सारे पळु लागले तेव्हां... मध चाटत पर्यंत राह्यच त्यातील गोडवा संपला की तो असा आहे? तो तसा आहे? त्यांनी जी आंबेडकरी चळवळीसाठी जी सेवा दिली त्यांचे मोल नाही. उलट लोक उलटुन म्हणतात, केंव्हा दीली, असे एहसान फरामोश अशी एक जात या लोककलेत जन्माला आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक येथे खुर्चीवर बसुन कलावंताचा जलसा बघितला. त्यांच्यासोबत दादासाहेब गायकवाड सुद्धा होते. हिरामण शेजवळ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विश्वासू कार्यकर्ते त्यांनी हा योग घडवून आणला, यावरुन कलावंताच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कीती आपुलकी होती. साध्या दरीवर कलावंतानी सादरीकरण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळातला वेळ काढून कलावंताची कदर केली व आपण त्यांच्या मोठेपणाला बाजारात मांडले आहे. आपल्यातले स्टेज पाहिजे. उच्च दर्जाचा साउंड पाहिजे, ठिक आहे काळानुसारचा हा बदल. परंतू यातही कव्वाल, गायकाची, दलालांची दलाली पक्की असते?

तमाशा बघत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः मार्गदर्शन करुन यातील अश्लील भाग कमी करायला सांगितला. तमाशातून धम्म व शिक्षण यांचा प्रचार झाला पाहिजे असे सुचविले आणि त्या तमाशातील लोकांनी ऐकले. नंतर आपल्याला धम्म प्रचार, प्रसाराचे तमाशे पाहायला मिळाले आणि आपण या प्रकाराला पुन्हा अश्लीलतेकडे नेत आहोत, फक्त आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत पतित पावनदास (केशव नारायण देव, वर्धा) हे मुळ कीर्तन, गायन, करणारा त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य एखाद्या धर्म योद्ध्याप्रमाणे अस्पृश्यात नवचेतना निर्माण करण्यात घालवले. महाडच्या सत्याग्रह, नागपूरची परिषद यात त्यांचा सहभाग होता. त्यांनी महाराष्ट्रात जनजागृतीसाठी फिरण्याचा विडा उचलला व आपल्या गायनातून कीर्तनातून समाज जागृतीच्या कार्याला गती दिली. ते म्हणतात, समाज सेवा करुन मर्द अजरामर होतो। श्वानापरी तोंड नामर्दच मरतो। समाज सेवा करुनी मर्द नरकेसरी झाला। कोंबळा हा नामर्द व्यर्थ घरच्या घरी मेला। अशी अवस्था ढोंगी कव्वाल गायक यांच्यावर येऊ शकते ज्या पतीत पावनदास यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहवास लाभला. त्याला आपण गुरु केला नाही? आपला आदर्श सतलज नदीच्या प्रवाहातून जी घाण आली. तिलाच आपण कवटाळत आहो? दुय्यम कव्वाली आज स्त्रियांना डोळे मारणारी ठरत आहे. स्त्री गायकांना मुसलमान कव्वाल तिरप्या नजरेने पैसे वाटतो. लोकांचे, अपमान जनक भाषा, अश्लिल हातवारे आणि तसेच गित लिहुन देणारे फडतूस गीतकार निर्माण होत आहे व पद प्रतिष्ठा, पैसा इत्यादीच्या आवर्तात आंबेडकरी कव्वाली सापडली आहे. हे आवर्तन उध्वस्त करणेच एकमेव उपाय आहे? त्यासाठी नैतिक मूल्ये जोपासणाऱ्या गायक कव्वालानी एकत्र येऊन हे क्रांतिकारक कार्य करावे. मनोज राजा म्हणतात,

**रंक नव्हता साधा । त्याला राव केला।**
**त्याच माणसाने पाठीत घाव घातला ।●●**



**प्रवीण कांबळे**
**मो. 9545499931**

# चढता आलेख
# ' मागे वळून पाहता..'

**अलिकडेच डॉ. भास्कर गणवीर यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन झाले. त्यापैकी 'मागे वळून पाहता' हे पुस्तक वाचतांना वरील ओळींची प्रचिती आली. त्यांच्या जीवनप्रवासातील त्यांना आठवणीत असलेल्या नोंदी यात आहेत तर दुसरे दीर्घ शिर्षक असलेले (आंतरराष्ट्रीय पर्यटन आणि बोधीपथ एक अविस्मरणीय अनुभव) पुस्तक त्यांनी विदेशात आणि प्रामुख्याने बौद्ध स्थळांना दिलेल्या भेटींवर आधारित आहे.**

**वक्त ने भलेही छिनली हो खुशिया हमसे**
**लेकीन अकेले लढनेका हुनर सिखा दिया..!**

डॉ. भास्कर गणवीर व्ही. एन. आय. टी. नागपूर इथून कुलसचिव पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. पण या पदापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न म्हणजे जिद्द, चिकाटी, इच्छाशक्ती, श्रमाची तयारी आणि योग्य मार्गदर्शन याचा एकत्रित प्रत्यय 'मागे वळून पाहता' या पुस्तकातून येतो. लेखकाची कौटुंबिक आर्थिक स्थिती समाजातील इतरांसारखीच होती. त्यामुळे त्यांना लवकर नौकरी शोधणे भाग होते. प्रयत्नरत असतांनाच भारतीय वायुसेनेत वायू सैनिक म्हणून पूर्ण प्रक्रिया पार पाडून त्यांची निवड झाली. या सेवेत असतांनाच त्यांनी १९७१ च्या भारत पाकिस्तान युद्धात सहभाग घेतला होता. युद्धातील जबाबदारी योग्यरित्या पार पाडल्याने त्यांना 'संग्राम मेडल' ने गौरवले गेले. या सेवेत पंधरा वर्ष ते होते. सतत बदली त्यामुळे देश बघायला मिळाला. पण कुटुंब स्थिरस्थावर होत नव्हते. त्यामुळे पंधरा वर्ष सेवाकाळ झाल्यावर ते निवृत्त झालेत. ते एका जागी स्थायिक होण्याच्या विचारातूनच. या नोकरीत असताना त्यांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. त्याचा लाभ पुढच्या काळात त्यांना झाला. नोकरीसाठी प्रयत्न करीत असताना नागपूरच्या व्ही.एन.आय.टी. मध्ये सुरक्षा विभागात ती संधी मिळाली. काही वर्षे सुरक्षा अधिकारी पदावर सेवा केल्यावर याच संस्थेत कुलसचिव पदावर त्यांना नियुक्ती मिळाली. एकूणच हा त्यांचा प्रवास इतरांसाठी मार्गदर्शक, प्रेरक आणि अनुकरणीय असा आहे. इच्छाशक्ती महत्वाची हे पुस्तक वाचताना जाणवते. या पदावरील अनुभव, सहकाऱ्यांच्या कुरघोड्या, जातीच्या नावावर मिळालेली वागणूक, टोमणे याचे त्रोटक संदर्भ यात आहेत आणि ते समाजव्यवस्थेचा मुखवटा ओरबाडणारे आहेत. संक्षिप्त स्वरूपातील नोंदींच्या या पुस्तकात प्रगतीचा आलेख अभिनंदनीय आहे. पण त्याचबरोबर संघर्षाचे क्षण आणि सामाजिक आंदोलनातील सहभाग याच्या नोंदी हव्या होत्या हे प्रकर्षाने वाचतांना जाणवते. पर्यटन विषयक पुस्तक म्हणजे प्रवास करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक अश्या प्रकारात मोडणारे आहे. किमान काही स्थळांची माहिती, जाण्यायेण्याचे मार्ग यातून कळतात. त्यांनी जिथे भेटी दिल्यात त्या स्थळांबाबत संक्षिप्त स्वरूपाची दिलेली माहिती इतरांना पर्यटनात सहाय्यक ठरणारी आहे. डॉ. गणवीर मुळात काही साहित्यिक नाहीत. त्यामुळे त्यांनी जे आठवले, सुचले ते त्यांच्या भाषेत व्यक्त केले आहे. साहित्यिक निकषांवर ते खरे उतरावे असा त्यांचाही आग्रह नसावा. पुस्तक वाचतांना त्यांची भाषा आणि त्यांची स्थिती आपली वाटून जाते हे त्यांच्या लेखनाचे यश आहे. परिस्थितीवर कायम दोष देणाऱ्यांसाठी त्यांच्या आयुष्यातील नोंदीचे संदर्भ प्रेरणा देणारे आहेत. डॉ. गणवीर यांना पुढील वाटचालीस मनस्वी शुभेच्छा.●●






**अनिरुद्ध कांबळे**
**मो.9922959770**

# मातंग समाजाची दशा आणि दिशा

मला जात विचारण्याची कुणाची हिंमत होत नव्हती. मी आणि मेहकरचे कवडू ताकतोडे अमरावतीचे विदर्भ महाविद्यालयात एम.ए. शिकत असताना होस्टेलला राहत होतो. ताकतोडे म्हणायचे, 'आपण होस्टेलला दोघेच मातंग आहोत.' मी हो म्हणायचा. दोन वर्षे पूर्ण झाली आणि आम्ही आता हॉस्टेल सोडणार होतो. जाताना मी मोठ्या धर्मसंकटात पडलो. ताकतोडेला जर दुसऱ्या कुणी सांगितले की मी महार आहे तर तो मला धोकेबाज म्हणेल, ही मला भीती वाटत होती. त्याला घेऊन मी गार्डनमध्ये बसलो. त्याला सांगितले की जन्माने मी महार आहे. पण काम मी मातंगात करतो. तुमचा गैरसमज होऊ नये म्हणून मी तुम्हाला सांगतो आहे. तो शून्यात येऊन एकसारखा माझ्याकडे बघत बसला. त्याचे तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता. माझे मातंग समाजाचे सोबत जिव्हाळ्याचे संबंध आजपर्यंत आहेत. ही पार्श्वभूमी तयार करण्यासाठी मी हे प्रसंग सांगितले. शब्द मर्यादेमुळे मी या खोलात न जाता मला जे मांडायचे आहे त्याकडे वळतो. एकेकाळी मानव टोळ्या करून राहत होता. ज्या टोळ्यावर अस्पृश्यता लादली त्यात भारतातील १०५० जातीची नोंद १९३५ साली करण्यात आली. त्यापूर्वी आदिवासी व ३७४३ ओबीसी जातींना शूद्र वर्णाचे आणि अस्पृश्य जातींना अतिशूद्र वर्णाचे लोक ही ओळख होती.

**मी मातंग असलो काय किंवा नसलो काय माझे करीता हा प्रश्न अप्रस्तुत आहे. कारण मातंग माझे आहेत आणि मी मातंगांचा आहे. सावनेरला जेव्हा मी रहिवाशी होतो तेव्हा तेथील मातंग समाजाचे लोक म्हणायचे, 'अशोक भाऊ मातंग आहेत आणि त्यांची पत्नी बौद्ध आहे.' बहुजन समाज पक्षातील अनेक लोक म्हणायचे, अशोक भाऊ मातंग आहेत आणि अनेकजण म्हणायचे महार आहेत.**

अतिशूद्र वर्णाचे लोक भारतातील वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या नावाने ओळखले जातात. एकेका राज्यात देखील अनेक जाती त्यात येतात. महाराष्ट्रात महार, मांग, चांभार आणि मेहतर या चार जाती मोठ्या संख्येत आहेत. महार जातीचे लोकांची संख्या अस्पृश्य वर्गात साठ टक्के इतकी आहे. देशात चांभार जातीची संख्या अस्पृश्यामध्ये साठ टक्के असून राष्ट्रीय स्तरावर आहे. मेहतर जात संख्या कमी असली तरी ती राष्ट्रीय स्तरावर आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर चांभार जात आंदोलनाचे नेतृत्व करते. महाराष्ट्रात महार नेतृत्व करते. तिथे महार, मांग, चांभार, भंगी हा विषय रहात नाही. दलीत समाजावर अन्याय, अत्याचार कोठेही होवोत. महाराष्ट्रात महार आणि उत्तरेत चांभार लोक अन्यायाविरुद आंदोलन करतात. त्यामुळे या दोन जातींचा तिरस्कार जातीयवादी हिंदू आणि ब्राम्हण लोक करतात. महाराष्ट्रात महारांचा विरोध करण्यासाठी मातंग समाजाचा गैरवापर करण्यात येत राहते. कारण या दोन्ही जाती शेजारी राहतात. दोघांमध्ये बेटी व्यवहार सहज होत नाहीत. महार विरोध किंवा इर्षा असल्यामुळे मातंग समाजाच्या लोकांनी डॉ. बाबासाहेबांचा देखील विरोध केला आणि आजही करतात. त्यामुळे आंबेडकर जे सांगतील अगदी त्या विरुद्ध भूमिका मातंग घेतात. जसे की अस्पृश्यांनी पारंपरिक धंदे सोडले पाहिजे असे डॉ. बाबासाहेब उपदेश करतात. महार कामदारी आणि ढोरे ओढणे सोडतात. पण मांग ते सुरू ठेवतात. बँड वाजवणे ग्रहण मागणे सुरूच ठेवतात. त्यामुळे महार शिकायला सुरुवात करतो, शहरात जातो. मांग बँडमुळे शिक्षण सोडतो. शंभर मांग मुले पहिल्या वर्गात दाखल झाली असतील तर चौथ्या वर्गात केवळ ७५ राहतात. कारण २५ मुले बँड वाजवणे सुरू करतात. आठव्या वर्गात केवळ ५० टिकतात. दहाव्या वर्गात २५ टिकतात. १२ व्या वर्गात १० टिकतात. पदवी पर्यंत २ टिकतात. एखादा उच्च शिक्षण घेतो. आरक्षण सर्वांनाच मिळते. पण मांग त्याचा लाभ घेत नाही किंवा स्पर्धेत उतरत नाही. त्यामुळे ते आरोप करतात महार नसता तर मला नोकरी मिळाली असती. आरक्षणाचा लाभ महाराष्ट्रात सर्वप्रथम चांभार जातीने घेतला. त्यानंतर महार जातीने घेतला. शाळा महाविद्यालयात नोकरी देताना चांभार आणि खाटिक यांना प्राधान्य देण्यात येते. कारण ते हिंदू असतात. ते अन्याय अत्याचाराचा विरोध करीत नाहीत. महार हिंदू धर्म सोडतो आणि बौद्ध धर्म स्वीकारतो. त्यामुळे त्याचा हिंदू संस्थाचालक तिरस्कार करतात. हे दोन नाही भेटले तर महार व्यक्तीची निवड करण्यात येत असते हा अलिखित नियम आहे.

राजकारणात खाटिक, चांभार आणि मांग व्यक्ती निवडून येतात. महार जातीपेक्षा मांग, चांभार लोक आमदार, खासदार आणि मंत्री जास्त असतात. जे मातंग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्वीकार करतात ते शिक्षण घेतात आणि नोकरीला देखील लागतात. ते रडत बसत नाहीत. पण मातंग समाजातील लोक त्यांचेही ऐकत देखील नाहीत. त्यामुळे ते लोक देखिल त्यांचेपासून अलग राहतात. त्यांनी हिंदू धर्म सोडून बौद्ध धर्म स्वीकारला असतो. बऱ्याच लोकांनी महार जातीच्या मुला मुलींसोबत मिश्र विवाह देखील होत आहेत. पण जे हिंदू मातंग आहेत ते मात्र ब्राह्मणांचे चिथावणीने महारांना शत्रू मानून त्यांचा द्वेष करतात. हे वास्तव आहे. ब्राम्हण नेहमी 'डिव्हाइड अँड रुल' या नीतीने वागतात. मातंग सदा सर्वदा महार विरोधाचे नशेत झिंगत असतात. उपवर्गीकरण ही मागणी केवळ मातंग समाजच करीत आला आहे. त्याचा लाभ त्याला कधीच होणार नाही हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. आरक्षण संपल्यावर मातंग समाजाला ते कळेल आज कळणार नाही.

आरक्षणाला विरोध ब्राम्हणांनी केला आणि आजही करतात. त्याविरुद्ध लढा मातंग कधीच देत नाहीत. महार लढतो आणि इतर त्याचा आयता लाभ घेतात. अन्यायाविरोधी कायदा व्हावा म्हणून महार लढतो आणि इतर त्याचा आयता लाभ घेतात. हे कुणालाही नाकारता येत नाही. कुणबी विरुद्ध माळी, कुणबी विरुद्ध तेली, कुणबी विरुद्ध धनगर, कुणबी विरुद्ध वंजारी असा संघर्ष हा जसा जाणीवपूर्वक निर्माण केला तसाच आपसी संघर्ष महार विरुद्ध चांभार, महार विरुद्ध मातंग, महार विरुद्ध भंगी या समाजात महाराष्ट्रात निर्माण करण्यात आला. यात या कोणत्याही जातीचे भले नाही. हा सवर्ण हिंदूंचे डावपेचांचा भाग आहे. हे मात्र मातंग समाजाला कधीच समजणार नाही आणि समजून घेण्याची त्यांची इच्छाही नाही. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असे जरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले असले तरी भीक मागून जगण्याची संवय असणारा कोणत्याही लाचार समाज आणि व्यक्तीबद्दल ते लागू होईलच असे वाटत नाही. भूषण गवई, प्रा. ज्योगेंद्र कवाडे आणि ॲड. सुलेखाताई कुंभारे यांच्याकडे पाहून आपण काय म्हणू शकतो? झोपलेल्या जागे करता येते. पण झोपेचे सोंग घेणाऱ्याला जागे करता येत नाही. मातंग समाज झोपेचे सोंग घेऊन आहे. मातंग समाजाला कितीही टक्के आरक्षण द्या तरी त्यांना त्याचा काहीही फायदा होणार नाही. कारण लढणे हे तो विसरला.

पोचीराम कांबळे, चंदर कांबळे,अण्णाभाऊ साठे हे देखील मातंग जातीतीलच लोक होते. ते लढून अमर झाले. कितीही असू द्या तो जर भीक मागत असेल तर तो कधीच स्वाभिमानी होणार नाही. ज्या हिंदू धर्माने मातंग समाजावर अस्पृश्यता लादली त्या हिंदू धर्मात तो किंवा कोणताही दलीत समाज रहात असेल तर तो जिवंत असलेला मुर्दा आहे असेच म्हणता येईल. मातंग समाजाला प्रगती करायची असेल तर त्यांनी भगवान बुद्ध, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांना आदर्श मानलेच पाहिजे. त्याने कोणत्याही परिस्थितीत हिंदू धर्माचा त्याग केला पाहिजे. त्याने बुद्ध धम्म ग्रहण करून बुद्धिवादी आणि सदाचारी होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मरण आले तरी चालेल पण त्याने भीक मागण्याची संवय त्यागली पाहिजे. स्वाभिमान हाच त्याला तारू शकतो. शिक्षण घेऊन गुलामीतून मुक्त व्हावे. शिक्षण केवळ नोकरीसाठी घेऊ नये. गुलामीतून मुक्त व्हावे म्हणून शिक्षण घेतले पाहिजे. समदुःखी लोकांचे सोबत राहून त्याने नेतृत्व करायला पुढे आले पाहिजे. नेतृत्वाची क्षमता त्यागातून, बुद्धिमत्तेतून, संघर्षातून त्याने सिद्ध केली पाहिजे. महार जातीसहित सर्व दलीत बहुजनांचे नेतृत्व करेल ही क्षमता त्याने सिद्ध केली पाहिजे. मेहतर समाजात ज्यांचा जन्म झाला त्या आंबेडकरवादी आणि बौद्ध उपासक रामरतन जाणोरकर यांनी तमाम बौद्धांचे नेतृत्व केले. तशी त्यांनी क्षमता निर्माण केली होती. तसा एकही लाल मातंग समाजात जन्मला नाही. तो जन्मावा हे स्वप्न मी आणि माझ्यासारखे अनेक लोक पहात आहे. महारांनी कांशीराम नावाच्या चांभार जातीत जन्मलेल्या महापुरुषाचे नेतृत्व स्वीकारले होते हे वास्तव मान्य केले पाहिजे. अण्णाभाऊ साठे यांचे मोठेपण महार जातीने मान्य केले. यांच्यातही कुणाला शंका असण्याचे कारण नाही. मातंग समाज अण्णाभाऊ साठे यांच्या नावाचा केवळ वापर करतो त्यांचे तत्व तो नाकारतो. भाजपच्या ताटातील मांजर होणारा अण्णाभाऊ यांचा अनुयायी होऊ शकत नाही. चुका मान्य करणारा महान असतो. चुका मान्य न करणारा अप्रामाणिक असतो. आपली आपणच समीक्षा करावी त्यातून दिशा मिळत असते. ही क्षमता मातंग समाजात यावी ही मंगल कामना मी जसा तशी आपण सर्वांनी देखील करावी.●●




**लेखांक161**



**अशोक सरस्वती बोधी**
**मो. 8530980741**



**काव्यफुले**
संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

## माणसं हेरायची

माणसं पेरायची
मशागत करायची
पीक जोमात आलं
की दमदार पक्ष्यांनी
मनसोक्त कापायची

पाणी भरायचं
आकाश बघायचं
मुकाट हसायचं
रक्ताचं पाणी करत
पीक उगवायचं
भरात आल्यावर
पक्ष्यांनी पळवायचं

आणि आम्ही काय नुसतंच
बघत बसायचं

**शफीक शेख**

## येरे येरे पावसा...

येरे येरे पावसा
रागावू नको असा
काय केला गुन्हा
आत्ता नाही पुन्हा
नाचत गाजत ये
धावत पळत ये
स्वागत तुझे करू
नवी बीजे पेरू
अंकुरीत बीजे
अवनीही लाजे
बहरली येण्याने
नटलीशी सणाने
लावू झाडे पुन्हा
गाईला येई पान्हा
सृष्टी होई तृप्त
दृष्टी रंगी सप्त

**मीनाक्षी दमयंती**

## वट पौर्णिमा (पुरुषाची व्यथा)

ऐक ना रे वड राजा
माझी तू व्यथा
त्रासून गेलो रे लयी
ऐकून या भाकड कथा
नको नको म्हणतो तरी
करते बायको उपवास
मनोरंजन होते तीच
मला होते अतिशय त्रास
घरी दारीं राब राब राबतो
सुख जराही नशिबात नाही
पुढ्यात तिच्या ताट ठेवतो
तरी डोळे वटारून पाहि
शिकली सवरली तरी
बुद्धीचा करत नाही वापर
थोडस जरा बिनसलं तर
फोडते डोक्यावर माझ्या खापर
तिने बांधलेले दोरे
सोडायला मीं आलो
पुढच्या जन्मी नको बाप्पा
याच जन्मी त्रासलो...

**-सुषमा कळमकर**

## धुर्त शिकारी आणि उपवर्गीकरण

धुर्त शिकारी आणि उपवर्गीकरण
पक्षाचा थवा अर्थात एक गट होता उपेक्षित
बाबासाहेबांनी आरक्षण दिले यांना एकत्रित
आरक्षणामुळे ते लागले मनसोक्त उडायला
एकाने बाबासाहेबांचे ऐकुन धम्म स्विकारला
आरक्षण व धम्म याचा दुहेरी प्रभाव झाला
विशाल आकाशही ते लागले सहज मोजायला

ही प्रगती पाहुन धुर्त शिकारी जळु लागला
उपवर्गीकरणाचे जाळे लागला फेकायला

सगळे पक्षी गेले उडून, एक लागला गळाला
त्याला लावली उपवर्गीकरणाची मागणी करायला

या पक्षाला नव्हता शिकार्याचा कावा माहीत
दुष्ट हेतु होता भांडण लावणे गटाचे आपसात

या चुकलेल्या पक्षाचा होता हक्क तेरा टक्यावर
संख्येनुसार त्याला एक दोन टक्केच मिळणार

वाट चुकलेल्या बंधुचे होउ देणार नाही नुकसान
उपवर्गीकरण नको म्हणून करणार सगळे आंदोलन

बंधुनो उपवर्गीकरणाचा घातक धोका घ्या समजुन
बाबासाहेबांचे दुरगामी विचार हेच आहे आपले धन

**-इंजि.नरेंद्र ताकसांडे**

## जागर मानवतेचा...



लढणे प्रस्थापितांशी - ताकद तुझीच होती..
देता भेदांना मुठमाती - हाक तुझीच होती..

वंचिता भरोसा तो - विद्येचा तुझाच होता..
गाठण्या ज्ञानाचे शिखर - साथ तुझीच होती..

लाथाडल्या तू साऱ्या - विषमता तो तुझा ध्यासं..
समता पेरणीत हिकमत - तुझीच होती..

साऱ्या दीनाची खुशाली - तू काळजात केरली..
मानवता ही एकच - जमात तुझीच होती..

चवदार केले तळे - तो काळा रामही खुले...
लढे असे उभारण्या - हिंम्मत तुझीच होती..

प्रहार तुझाच होता - जागर मानवतेचा..
तमाम माणसे माझी - ही आसं तुझीच होती..

लढणे प्रस्थापितांशी - ताकद तुझीच होती..
देता भेदांना मुठमाती - हाक तुझीच होती....

**-दिनकर रा मडकवाडे**

## म्हणून जागृत झाला स्वाभिमान



बहुजनासाठी शाळा वस्सतीगृह,
काढून खुले केले शिक्षन - रोजगाराचे दालन घेऊन
शिक्षण बहुजनाचे उघडले नयन
२माणूस २म्हणूनजागृत झाला स्वाभिमान... १..

परिवर्तन अन समतेचे बीज पेरून
शोषित पिडीत बहिष्कृत एकत्र केले
जन सर्वांत बंधुत्व जगावे माणूस
म्हणून एकत्र यावे सर्वांनी भेदभाव दूर सारून.. २..

बाबासाहेबांच्या विद्वत्तेचे मर्म जाणुन
नेता तुमचा असा असावा घ्या पारखून भीमराव !
काढतील तुम्हा गुलामगिरीतून
२माणगावच्यार परिषदेत केले आव्हान...३..

होती त्यांची ओढ सामाजिक न्यायासाठी केली
मदत मूकनायका लंडनला जाण्यासाठी लढले
विषमते विरुद्ध बहुजनाच्या उध्दारासाठी
शाहूमहाराज लढले अंधश्रद्धेतून काढण्यासाठी...४..

**इंजि. शुद्धेधन बडवणे**

## ही लढाई दीक्षाभूमीची



दीक्षाभूमी च्या जागेसाठी
भिमसैनिक आता लढतो आहे ..
समाज साथ देनार का
हे तो बघतो आहे....
स्तुपाची अवस्था
दिवसेनदिवस
ढासळत आहे...
समाज निवांत हे सगळ बघत आहे...
भीमाचा छावा आता कॉटन रिसर्चच्या
जागेसाठी लढनार आहे की घरी बसून सडनार आहे ...
तो म्हनाला घराची फिनिशिंग बाकी आहे
मिहि म्हानालों दीक्षाभूमि च्या
रिनोवेशनची वेळ आता आली आहे....

तो पुनः म्हणाला ही वेंळ आहे उन्हाची...
हर्षल बेंबिच्या देठापासुन सांगत आहे
ही वेळ अस्तित्व टीकवन्याची ...

तो मनाला भीमामुळे आली चव बिसलेरिची ..
मि मनालो आहे का मित्रा हिम्मत तुझ्यात
तिथे ठंड पाण्याची सोय करन्याची

उठ पेटुन आणि लढ़ हिम्मतीने
कारण ही लड़ाई आहे
तुझ्या अस्मितेची...
परिवर्तन चळवळीच्या केंद्राची....

1 जुलै ची ही लढाई नाही केवळ जमीन संपादनाची ...
ही लढाई आपल्या इतिहासाची...
ही लढाई बाबासाहेबांच्या अपूर्ण स्वप्नपूर्तीची .....

**-हर्षल डांगे**

28 June 2026 page 03_Layout 1 6/27/2026 5:05 PM Page 1



“ आळस हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# व्यक्तीपेक्षा विचार मोठे, प्रसिद्धीपेक्षा कार्य श्रेष्ठ !

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज परिवर्तनासाठी दिलेला संदेश हा केवळ राजकीय किंवा सामाजिक संघर्षापुरता मर्यादित नव्हता. त्यांनी शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाजाला आत्मसन्मान, स्वावलंबन आणि प्रगतीचा मार्ग दाखविला. आजही त्यांच्या विचारांची प्रासंगिकता तितकीच महत्वाची आहे. समाजाच्या विकासासाठी केवळ घोषणांची नव्हे, तर कृतीशील आणि दूरदृष्टी असलेल्या कार्याची आवश्यकता आहे. वर्धा जिल्ह्यातील वायफळ येथे उभारला जात असलेला नालंदा अकादमीचा प्रकल्प हा अशाच विधायक आणि परिवर्तनवादी कार्याचा प्रेरणादायी नमुना आहे. वायफळ येथील सुमारे नऊ एकरांहून अधिक जागेवर उभारला जात असलेला नालंदा अकादमीचा प्रकल्प हा केवळ इमारतींचा समूह नसून सामाजिक बांधिलकी, सामूहिक नेतृत्व आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडविण्याच्या ध्येयाचा प्रेरणादायी नमुना आहे. या प्रकल्पाच्या उभारणीत अनुप कुमार आणि त्यांचे सहकारी अत्यंत शांतपणे, सातत्याने आणि निःस्वार्थ भावनेने कार्यरत आहेत. या कार्यामागे वैयक्तिक प्रसिद्धी, पदाची लालसा किंवा स्वार्थी हेतू दिसून येत नाही. उच्चशिक्षित तरुण-तरुणींचा एक समूह समाजाचे ऋण फेडण्याच्या भावनेतून नियोजनबद्ध पद्धतीने काम करत आहे. ज्येष्ठ नागरिकांचे मार्गदर्शन आणि तरुणांची ऊर्जा यांचा सुंदर संगम या उपक्रमात दिसून येतो. हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अपेक्षित केलेल्या शिक्षित, संघटित आणि समाजाभिमुख पिढीचे जिवंत उदाहरण आहे. आज समाजजीवनातील अनेक क्षेत्रांमध्ये एक चिंताजनक प्रवृत्ती वाढताना दिसते. समाजकारण, राजकारण, साहित्य, पत्रकारिता, सांस्कृतिक क्षेत्र किंवा विविध सामाजिक संघटनांमध्ये अनेकदा कार्यापेक्षा व्यक्ती मोठी होताना दिसते. समाजहिताच्या उद्दिष्टांपेक्षा स्वतःची प्रतिमा निर्माण करणे, प्रसिद्धी मिळविणे आणि वर्चस्व सिद्ध करण्याला अधिक महत्त्व दिले जाते. परिणामी मूळ उद्दिष्टे मागे पडतात आणि समाजहित दुय्यम ठरते. कोणतीही चळवळ एका व्यक्तीच्या बळावर उभी राहत नाही. तिच्यामागे अनेक ज्ञात-अज्ञात कार्यकर्त्यांचे योगदान असते. त्यामुळे व्यक्तीपेक्षा विचार आणि प्रसिद्धीपेक्षा कार्य मोठे मानण्याची मानसिकता समाजात निर्माण झाली पाहिजे. समाजाच्या प्रगतीचा केंद्रबिंदू माणूस आहे. त्यामुळे प्रत्येकाने सर्वप्रथम माणसासारखे वागले पाहिजे. कोणत्याही पदावर असो किंवा कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असो, त्याच्या वर्तनात मानवता, संवेदनशीलता आणि नम्रता असणे आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जग जवळ आणले असले तरी मानवी नात्यांमध्ये दुरावा वाढत आहे. स्वार्थ, अहंकार आणि स्पर्धेच्या अतिरेकामुळे माणुसकीची मूल्ये मागे पडत आहेत. समाजाच्या विकासासाठी भौतिक प्रगतीइतकीच नैतिक मूल्यांची जोपासना आवश्यक आहे.




समाजातील ज्येष्ठ व्यक्तींचा सन्मान करणे ही आपल्या संस्कृतीची परंपरा आहे. त्यांचा अनुभव, संघर्ष आणि ज्ञान पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरतो. दुसरीकडे तरुणांकडे ऊर्जा, नवीन कल्पना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान आहे. ज्येष्ठांचा अनुभव आणि तरुणांची ऊर्जा यांची सांगड घातली तर समाजकारण अधिक प्रभावी होऊ शकते. नालंदा अकादमीचा प्रकल्प हेच दाखवून देतो की पिढ्यांमधील समन्वयातून मोठी सामाजिक कामे उभी राहू शकतात. खरे समाजकार्य हे संकटाच्या काळात ओळखले जाते. अनेक जण कार्यक्रम, सत्कार आणि प्रसिद्धीच्या माध्यमातून समाजसेवेचा आव आणतात. परंतु एखाद्या व्यक्तीवर किंवा समाजावर संकट आले असता मदतीचा हात पुढे करणारेच खरे समाजसेवक असतात. गरजूंना मदत करणे, दुर्बल घटकांच्या पाठीशी उभे राहणे आणि शिक्षण, आरोग्य व सामाजिक न्यायासाठी सातत्याने कार्य करणे हीच खरी समाजसेवा आहे. भाषणांपेक्षा कृती अधिक प्रभावी असते. लोकशाही व्यवस्थेचा पाया सामूहिक सहभागात आहे. मोठ्या पदावरील व्यक्तीचा सल्ला जितका महत्त्वाचा असतो तितकाच सामान्य कार्यकर्त्याचाही विचार महत्त्वाचा असतो. निर्णय प्रक्रियेत सर्वांना संधी मिळाली तर संघटना अधिक सक्षम बनते. गटबाजी, वर्चस्वाची स्पर्धा आणि व्यक्तिपूजा यामुळे समाजकार्याचे नुकसान होते. सहकार्य, संवाद आणि परस्पर विश्वास यांच्या आधारावर उभी राहणारी संघटना अधिक काळ टिकते आणि अधिक परिणामकारक कार्य करते. आज सोशल मीडियाच्या युगात माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे. परंतु त्याचबरोबर अफवा, अपूर्ण माहिती आणि दिशाभूल करणारे संदेशही मोठ्या प्रमाणात पसरत आहेत. त्यामुळे पत्रकार, लेखक, अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी कोणतीही माहिती प्रसारित करण्यापूर्वी तिची सत्यता तपासली पाहिजे. समाजात विवेकनिष्ठ आणि वैज्ञानिक विचारसरणी रुजविण्यासाठी संदर्भाधिष्ठित अभ्यास आणि सत्यनिष्ठ लेखन आवश्यक आहे. कोणत्याही संस्थेच्या यशामध्ये आर्थिक सक्षमतेइतकीच आर्थिक पारदर्शकताही महत्त्वाची असते. निधीचा योग्य वापर, स्पष्ट हिशेब आणि पारदर्शक व्यवस्थापन यामुळे सदस्यांचा विश्वास दृढ होतो. विश्वास हेच कोणत्याही संस्थेचे सर्वात मोठे भांडवल असते. आर्थिक शिस्त आणि प्रामाणिकपणा यांमुळेच संस्था दीर्घकाळ समाजहिताचे कार्य प्रभावीपणे करू शकते.



विलास गजभिये
मो. 9421588901

इतिहासात ज्यांनी महान कार्य केले त्यांनी स्वतःच्या प्रसिद्धीचा कधी आग्रह धरला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि पेरियार यांसारख्या महापुरुषांनी समाजहिताला सर्वोच्च स्थान दिले. त्यांची महानता त्यांच्या विचारांत, कार्यात आणि त्यागात आहे. म्हणूनच आजही समाज त्यांना आदराने स्मरतो. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन व्यक्तीपूजेऐवजी विचारपूजा आणि घोषणाबाजीऐवजी कृतीला प्राधान्य देण्याची गरज आहे. आज समाजासमोर शिक्षणातील विषमता, बेरोजगारी, महागाई, सामाजिक असमानता, पर्यावरणीय संकटे आणि डिजिटल दिशाभूल यांसारखी अनेक गंभीर आव्हाने आहेत. या समस्यांवर मात करण्यासाठी प्रामाणिक कार्य, सामूहिक नेतृत्व, आर्थिक पारदर्शकता, शैक्षणिक प्रबोधन आणि मानवतावादी दृष्टिकोन आवश्यक आहे. वायफळ येथील नालंदा अकादमीचा प्रकल्प या मूल्यांची जपणूक करणारा आदर्श उपक्रम आहे. समाजातील सुशिक्षित युवकांनी स्वतःच्या प्रगतीबरोबर समाजाच्या उन्नतीसाठीही योगदान दिले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समतामूलक, शिक्षित आणि प्रगत भारताचे स्वप्न निश्चितच साकार होईल. समाजाचा विकास हा एका व्यक्तीच्या नेतृत्वावर नव्हे तर सामूहिक प्रयत्नांवर अवलंबून असतो. म्हणूनच आज प्रत्येकाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपण समाजासाठी काम करतो की स्वतःच्या प्रसिद्धीसाठी, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे. समाजहिताचे कार्य हेच अंतिम ध्येय असले पाहिजे. आपल्या कार्याचा गवगवा करण्यापेक्षा कार्याची गुणवत्ता वाढविण्यावर भर दिला पाहिजे. समाजाला आज अशा विचारांची आवश्यकता आहे की जिथे माणसाला माणूस म्हणून सन्मान मिळेल, ज्येष्ठांचा आदर राखला जाईल, सत्याला महत्त्व दिले जाईल, आर्थिक व्यवहार पारदर्शक असतील, संवाद कायम राहील आणि कोणत्याही प्रकारच्या वर्चस्वाच्या लढाया नसतील. अशा मूल्यांवर उभा राहिलेला समाजच खऱ्या अर्थाने प्रगत, सुसंस्कृत, समतामूलक आणि न्याय्य समाज ठरेल. व्यक्तीचा उदो-उदो नव्हे, तर समाजहिताचे प्रामाणिक कार्य, शिक्षणाचा प्रसार आणि मानवतेचा पुरस्कार हीच आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.●●

# गावखेड्यातील संस्कृती आणि आनंदमयी जीवन

गावाचे नाव जरी ऐकले तरी डोळ्यासमोर संपूर्ण गाव उभा राहतो ही आहे गावखेड्याची महानता! गावात नसतील तेवढे पैसे. पण, मान बघायला मिळतो, गावात नसतील कोणत्या सुख, सुविधा पण, एकमेकांच्या आधाराने काम होत असतात. गावात नसतील दहा मजली इमारती. पण, त्या कुडामातीच्या घरात आनंदी, आनंद द्विगुणित दिसतो, तो आहे गावखेड्यातील स्वर्ग, गावातील महिला भलेही तेवढ्या उच्च शिक्षित नसतील. पण, त्यांच्या अंगभर कपडे बघायला मिळतात. ही आहे गावखेड्यातील संस्कृती, गावात तेवढे कोणी श्रीमंत नसतात. पण,दोन शब्द प्रेमाने बोलण्यासाठी त्यांच्याकडे वेळ असतो. ती असते गावखेड्यातील आपुलकी, गावात मुलांना खेळायला भलामोठा पंटागण नसेल. पण, गावातील मुले गल्लीतून एकत्र येऊन एकमेंकांच्या मागे धावून खेळत असतात, ते आहे बालमनावर झालेले संस्कार, गावात घरोघरी नसतील शानदार चारचाकी गाड्या. पण, बैलगाडीने शेतकरी राजा जेव्हा, शेतात पिकलेले मेहनतीने कमावलेले सोने मोठ्या समाधानाचे, बिनधास्तपणे गावातून मिरवत आणतो ती आहे प्रामाणिकपणे कमावलेली कमाई, गावात मोठे, मोठे भोजनालय (हॉटेल) नसतील. पण, एकत्रित जमून जेव्हा घरातील महिला उन्हाळ्यात, अंगणात स्वयंपाक मिळून करतात तो, असतो एकप्रकारचा महाप्रसाद, गावात असणारी हिरवेगार झाडे आणि तो वाहत असणारा थंडगार वारा मन अगदी प्रसन्न करून टाकते. वातावरण सुद्धा तेवढाच चांगला असतो, प्रदूषण झालेले कधीच बघायला मिळत नाही.




गावखेड्यातील संस्कृती जणू निसर्गाला सुद्धा गहिवरून सोडते. जसे की, सण, उत्सव आणि तेथील राहणीमान, खाद्यसंस्कृती जगाच्या पाठीवर शोधून कुठेही बघायला मिळत नाही. गावातील महिलांना क्षणभरासाठी सुद्धा वेळ नसतो तरीही विहीरीवर, बोरवेलवर पाणी भरण्यासाठी जमा होतात तेव्हा, पाणी हलवून देण्यासाठी एकमेकांना मदत करतात, खळखळून हसून गोष्टी सांगतात, एवढेच नाही तर एकमेकींच्या घरची भाजी खातात. सण कोणतेही असो, आजही गावखेड्यात अशी एक जुनी प्रथा आहे की, सणाच्या दिवशी बनविलेले गोड, थोड पदार्थ एकमेकांच्या घरी नेवून देतात. त्यामुळे गावखेड्यात आपुलकी आणि स्नेह बघायला मिळत असते. त्यांच्या डोक्यावर असलेला पदर ही या गावखेड्याची संस्कृती नाही तर भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवून आणते. म्हणूनच गावखेड्यातील लोकांना शहरातील वातावरण आणि वेषभूषा, राहणीमान आवडत नाही, वास्तव सत्य आहे. गावखेड्यातील कौलारू घरे आणि शेणामातीचे सारवण आणि अंगणात बांधलेल्या गाई, बैल जणू घरादाराची शोभा वाढवतात त्या गाईंना संध्याकाळी नैवद्य चारले जाते आणि तिचे आशीर्वाद घेतले जाते ही गावखेड्यातील गाई प्रती असलेली विशेष श्रद्धा आहे. गावखेड्यातील संस्कृतीची बरोबरी कुठेच होऊ शकत नाही. कारण, गाव शेवटी गावच असते. त्या गावात धनसंपत्तीपेक्षा नात्यांना, मित्रांना मुक्या पाळीव प्राण्यांना तसेच माणसाला, माणुसकीची साथ दिली जाते. वृद्धाची सेवा सुद्धा बघायला मिळते, म्हणून गावखेडा सर्वांना हवाहवासा वाटतो. कारण गावखेड्यात आनंद, समाधान आणि माणुसकीची जाणीव, आपुलकीची भावना बघायला मिळत असते.●●



संगीता संतोष ठलाल
7821816485

# नवोदिताना प्रेरणा देणारे शाहीर लोखंडे गुरूजीच्या आठवणी

गेल्या आठवड्यात दोन जून 2026 रोजी अखिल भारतीय मराठी शाहीर परिषदेचे माजी अध्यक्ष मंडणगड येथील शाहीर लोखंडे तथा हरिश्चंद्र कृष्णा लोखंडे गुरुजींच्या निधनाची बातमी वाचली. गुरुजींच्या अंतिम दर्शनाकरीता उपस्थित राहता आले नाही, याचे शल्य मनात कायम राहिले. गुरुजींचे नाव मी जवळपास चाळीस वर्षे ऐकून आहे. माझे सासरे वि. बा. गमरे गुरुजी यांचे ते विद्यार्थी, त्यांची पत्नीही गमरे गुरुजीची विद्यार्थ्यांनी असे मी गमरे गुरुजींकडून ऐकले आहे. त्यांची नोकरीची 1950ते 1968अशी सेवा मंडणगड दापोली या तालुक्यात लोखंडे गुरुजींच्या गाव परिवारात झाली. गमरे गुरुजींनाही गायन काव्य लेखनाची आवड होती. त्यांच्याकडून शाहीर हरिश्चंद्र लोखंडे यांच्या कलागुणांची त्यांच्या परिवाराची माहिती ऐकली आहे. शाहिरांचा मुळगाव तळेघर, आजोळी टाकळी येथे, मामाच्या घरी प्राथमिक शिक्षण, पुढे त्यांनी शिक्षकी पेशा स्वीकारला, अनेक विद्यार्थी घडविले. मुख्याध्यापक पदावरून ते सेवानिवृत्त झाले. रत्नागिरी आकाशवाणी केंद्र येथे वीस वर्षे लोकगीत व वगनाट्याचे कार्यक्रम प्रसारित केले, मुंबई दूरदर्शन येथे लोकगीत व लोकनाट्य कार्यक्रम सादर केले, कुणबी लढा न्यायासाठी ही ध्वनिफीत काढून कुणबी समाजात जागृती, वयाच्या सोळाव्या वर्षापासून विश्वजीत गायन पार्टी हा कव्वालीचा कार्यक्रम सुरु केला, आंतरराष्ट्रीय किर्तीचे लोकशाहीर विठ्ठल उमप, कवी गायक जनार्दन धोत्रे, कवी गायक बाबुराव खैरे, प्रख्यात गायिका चंद्रकला गायकवाड, यांच्यासोबत अनेक कवाली कार्यक्रम केले. लोकांची व्वा व्वा मिळवीली, नावलौकिक प्राप्त केला. ढोलकी सम्राट अनंत पांचाळ, बुद्धिवान घाडगे, जनार्दन रोडकर, कमलेश जाधव, यांसारख्या महान कलाकारांना सोबत घेऊन अनेक कार्यक्रम केले. अखिल भारतीय मराठी शाहीर परिषदेचे काम शाहीर साबळे व मधुकर नारळे यांच्या समवेत सुरू करून महाराष्ट्रातील ४०० हून अधिक कलाकारांना शासकीय मानधन सुरू केले, लोककला मराठी शाहीर परिषदेचे संस्थापक, मंडणगड येथे कला भवन निर्माण करण्यात त्यांची महत्त्वाची प्रमुख भूमिका होती. त्यांचे योगदान मोलाचे ठरले आहे. बहुजन समाजाच्या प्रबोधन करीता त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्यान दिली दिली.

2002 साली लोकशाहीर विठ्ठल उमप यांना भेटण्यासाठी त्यांच्या घरी गेलो. गप्पांच्या ओघात उमप बाबा म्हणाले, राष्ट्रपाल तुम्ही मंडणगड मध्ये शाहीर लोखंडे गुरुजींना आणि कवी बाबुराव खैरे यांना भेटा. खूप अनुभवी कलाकार आहेत. तुम्हांला त्यांची मदत, मार्गदर्शन मिळेल. गुरुजींची कन्या विजया कदम या लांज्यात प्राथमिक शिक्षिका असल्याने अनेक प्रशिक्षण मध्ये ओळख, त्यामुळे ताईकडून गुरुजींची ओळख. एकदा गुरुजी रत्नगिरीत भेटले. मी जयभीम करुन नमस्कार करण्यासाठी वाकलो, मला म्हणाले, तुम्ही राष्ट्रपाल आहात, छान लिहिता, वाचतो पेप मध्ये तुमच्या विषयी, साहित्य परिषद, वाचनालय मार्फत तुमचे काम चांगले सुरु आहे. लिहित, गात रहा. माझ्या शुभेच्छा आहेत म्हणाले. मंडणगडला आलात तर या घरी. मी गमरे गुरुजींची ओळख सांगितल्यावर तर ते बेहद खुश. मला म्हणाले गुरुजी सुद्धा उत्तम कवन रचित, अनेक ग्रंथ पुराणाचा त्यांचा अभ्यास होता. एकदा मी मंडणगडला लोखंडे गुरुजींना भेटायला गेलो तर गुरुजी रानात गाई म्हशी चरवायला गेलेले, घरातून निरोप गेल्यावर काही वेळाने आले. एक महान शाहीर, निवृत मुख्याध्यापक कंबरेला आकडी कोयती, हातात काठी, डोक्यावर गवताची पेंडी घेऊन अंगणात हजर. मला आश्चर्य वाटले. सत्तरीतले गुरुजी गुरे-वासरे, शेती नी शाहिरीत, कलाकारांना मानधन मिळण्यासाठी, प्रबोधन करण्यासाठी वणवण करत होते, चहा-नाश्ता घेऊन निघालो, त्यानंतर जानेवारी 2023 चिपळूणला लोककला महोत्सव आयोजनबाबत चर्चा करण्यासाठी काही लोकगीत संकलन करण्यासाठी कवी साहित्यिक अरुण इंगवले, प्रा. संतोष गोणबरे सोबत गेलो होतो. गुरुजींना हा उपक्रम खूप आवडला होता. असे प्रेमळ व्यक्तिमत्व त्यांच्या रूपात पाहिले, विजयाताई शिक्षक पतसंस्थेच्या संचालिका झालेया, ताईना निवडून येण्यासाठी हस्तेपरहस्ते सहकार्य केले, त्याविषयी गुरुजींनी समाधान व्यक्त केले. त्यांचे जावई लाज्यांचे विलास कदम यांच्याशी माझी चांगली दोस्ती. दोन मुलगे विश्वदास लोखंडे सावित्रीबाई फुले शिक्षण प्रचारक मंडळ, सह कार्यवाह, शाहीर परिषद, सरचिटणीस आहेत. सून काजल महिला पोलीस दक्षता समिती मंडणगड अध्यक्षा आहेत. छोटा मुलगा रणजित, अपंग आहे. चार मुली विजया कदम केंद्रप्रमुख होत्या, अक्षता साळवी, भावना इंगळे योग शिक्षिका, तृप्ती कासारे आय टी आय कॉलेजला शिक्षिका आहेत, सात नातू, चार नाती सर्व उच्चशिक्षित असून काही चांगल्या ठिकाणी सेवेत आहेत. गुरुजींचे धाकटे बंधू रविंद्र लोखंडे हे धार्मिक कार्यात सक्रिय असून ते श्रामणेर आहेत. एक मुलगा गरिबीतून तत्कालीन परिस्थिती नुसार सातवी शिक्षण घेऊन प्राथमिक शिक्षक होतो. इमाने इतबारे नोकरीं करतो, कला जोपसतो, कलाकार यांना प्रोत्साहन देतो, महाराष्ट्रात कला कार्यात आपला नावालौकिक करतो, आपल्या मुला-नातवंड यांना शिक्षण नोकरींसाठी योग्य मार्गदर्शन करतो. पत्नी सुजाता यांची योग्य साथ समाजाचे सहकार्य, बुद्ध, फुले, शाहू आणि परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा गुरुजींनी अंगीकारली, कलावंत यांना जातधर्म पंथ यांचे बंधन नसते. गुरुजींनी सर्व जाती धर्मातील कलावंत नी समाजात आपली कला जोपासली, वाढविली. पण आपल्या मूळ विचाराची कास कायम ठेवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक धार्मिक चळवळ, विचार खेड्यापाड्यात, वाडीवस्तीत महाराष्ट्रात नेण्यासाठी गुरुजीसारख्या शाहिरानी दिलेले योगदान विसरून चालणार नाही. शाहीर लोखंडे हे कवी विठ्ठल मोरे, शाहीर शंकर बाबुराव, शाहीर गोविंद नामदेव, यांना गुरुस्थानी मानत तर शाहीर शंकर भारदे व शाहीर तुकाराम मानकर हे त्यांचे कला क्षेत्रातील सहकारी मित्र कैलासवाशी शाहीर तुकाराम माळी हे लोखंडे गुरुजींचे मराठी शाहीर परिषदेतील खास सहकारी तर टी व्हिवर रेडिओ स्टार गायक मुकुंद तांबे हे त्यांचे खास शिष्य. बुद्धीवान घाडगे हे त्यांचे आकाशवाणी केंद्रातील सह कलावंत यांची उत्तम साथ मिळाल्याची आठवण ते सांगत. गुरुजींचा जन्म 15 जुलै 1942 जवळपास 84 वर्षाचे आयुष्य गुरुजी मानसन्मानात जगले. गुरुजींच्या निधनाने त्यांच्या जीवन आणि कलेतील या आठवणींना उजाळा देण्यासाठी हा लेखन प्रपंच गुरुजींच्या स्मृतीना भावपूर्ण श्रद्धांजली.●●






राष्ट्रपाल भा. सावंत
मो. 9403144356

**डॉ. शील बागडे यांचा ₹अनुशील काव्यवाट₹ हा संग्रह म्हणजे एका संवेदनशील स्त्री मनाचा आत्मसंवाद आहे. यातील प्रत्येक कविता वाचताना कवितेच्या शेवटी पोहोचताच वाचकाच्या अंतर्मनात एक वेगळा प्रकाश पडतो,.... तो म्हणजे चिंतनाचा ,संवेदनेचा, सौंदर्याचा. कवयित्री स्वतः डॉक्टर आहे, परंतु डॉक्टर इतक्या सुंदर कविता लिहू शकते का? हा एक मनाला प्रश्न पडतो.**

# अनुपम सृजनसौंदर्याचे अक्षरलेणे अनुशील काव्यवाट

डॉ. शील बागडे यांचा ‘अनुशील काव्यवाट’ हा संग्रह म्हणजे एका संवेदनशील स्त्री मनाचा आत्मसंवाद आहे. यातील प्रत्येक कविता वाचताना कवितेच्या शेवटी पोहोचताच वाचकाच्या अंतर्मनात एक वेगळा प्रकाश पडतो,.. तो म्हणजे चिंतनाचा, संवेदनेचा, सौंदर्याचा. कवयित्री स्वतः डॉक्टर आहे, परंतु डॉक्टर इतक्या सुंदर कविता लिहू शकते का? हा एक मनाला प्रश्न पडतो. डॉ. शील बागडे सुसंस्कृत, सुसंपन्न कुटुंबात जन्मलेल्या आणि विकसित झालेले व्यक्तिमत्व होय. मन आणि बुद्धी या दोन्हीला स्पर्श करणाऱ्या एकूण 76 कविता या पुस्तकांमध्ये समाविष्ट आहे. या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ अंतर्मुख करणारे व अतिशय बोलके आहे. मुखपृष्ठावर हिरव्या, निळ्या रंगाचे सुरेख मिश्रण आहे. त्यावर भारतीय तत्त्वज्ञानाचा निदर्शक असलेला केशरी रंगाची फुले बहरलेली आहेत. तसेच दुःखाकडे पाठ फिरवून त्याला पायदळी तुडवून योग्य मार्गाने मार्गक्रमण करीत आहे हे प्रभावीपणे जाणवते. सभोवतालचे वातावरण मंत्रमुग्ध करणारे आणि जीवनात सोनेरी प्रकाश किरण पसरलेले आहे हे दाखविलेले आहे. आयुष्य हे क्षणभंगुर आहे याची जाणीव ठेवून लिहिलेल्या या अष्टाक्षरी कविता अतिशय वाचनीय आहेत. भावनेचा ओलावा असलेल्या या कविता आहेत. कवयित्रीने आपला काव्यसंग्रह त्यांचे श्रद्धास्थान असलेल्या पिता स्व. डॉ. पांडुरंग उराडे आणि स्व. सासुबाई कलाताई बागडे यांना समर्पित केलेले आहे. ज्ञानसिंधु प्रकाशकाने प्रकाशित केलेला अनुशील काव्यवाट हा कवितासंग्रह होय. प्रत्यक्ष वाचनाच्या अनुभवातून या शीर्षकाची सार्थकता जाणवते. या काव्यसंग्रहाला राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त वनमालाताई पाटील - काशी कन्या यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभलेली आहे. प्रा. विजयाताई मारोतकर यांच्या शुभेच्छा तसेच डॉ. स्मिता मेहेत्रे यांचा अभिप्राय लाभलेला आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. लीना निकम यांचा ब्लर्ब असून अतिशय समर्पक असे मलपृष्ठ आहे. या काव्यसंग्रहात सर्व अष्टाक्षरी कवितांचा समावेश आहे आणि अष्टाक्षरी कविता लिहिणे एवढे सोपे नाही. हा डॉ. शील यांचा दुसरा अष्टाक्षरी कविता संग्रह वाचतांना जाणवते की जणू त्या अष्टाक्षरी तज्ञ झालेल्या आहेत. अनुशील म्हणजे शील, सभ्यता, मृदुता आणि जीवनाचा सन्मान होय. त्या नावातच त्याचा अर्थ आहे. निवडक 76 कविता असलेला हा संग्रह अतिशय वाचनीय आणि स्फूर्तीदायक आहे हे नक्कीच. कवितांना शब्द माधुर्य आहे. समाजातल्या जाणीवांना कवितेतून सजवलेले आहे. सुरुवातीलाच 'तुजसम तूच भीमा ''गौतम वाणी'या कविता श्रद्धा स्थानाला समर्पित आहे.

***‘तुझ सम कोण भीमा? अनुपम तू मानव. रत्न भारताचे असे, ज्ञानप्रद अभिनव’.***

***'जागर संविधानाचा “मतदान करू चलाया” कवितेतून आपल्याला नागरिकत्वाचे जाणीव करून देणाऱ्या आहे'. ‘आयुष्याची पहाट’ या कवितेतून जगण्याचा आशावाद सांगितलेला आहे.***

***‘हसायचं तर हस, रडायचं तर रड***
***नाचायचं तर नाच, चढ सुखाचाच गड’***

या सुरेख शब्द ओळी आहेत.

‘दैव जाणिले कुणी’ या कवितेतून होत्याच नव्हते, होणाऱ्या घटनांचा उल्लेख कवितेत समाविष्ट केलेला आहे. तसे बघता पर्यावरण वाचविणे काळाची गरज आहे. हा संदेश देणारी सुरेख कविता ‘घरटे देता का कोणी?’ या कवितेत प्रश्न विचारलेला आहे. 'डौलदार राजहंस'', कोजागिरी पौर्णिमा' या कविता वाचताना मन प्रसन्न होते. 'नणंद आली माहेरी' या कवितेतून आज समाजातील नातेसंबंधातील नैतिकतेचा रास आणि मूल्यांची पायमल्ली याचाही मार्मिक वेध घेणारी कविता अप्रतिम आहे. ‘आई बाबांच्या माघारी, दादा विचारेना पुन्हा, सुखी संसारात खुश, जाणे वाटे लेकी गुन्हा’ आईची आठवण आल्यावर कोण अबोल होणार? या आठवणी आपल्यापर्यंत पाझरत जातात. या आठवणींच्या रंगमहालात आपण स्वतःलाही हरवून बसतो. 'मायेची उब' आयुष्याची शिदोरी या कवितेतून किती अप्रतिम शब्दात कवयित्रीने आईचे वात्सल्य रेखाटलेले आहे. आठवणींचे हे झंकारत येणे चांदण्यालाही सूर द्यायला भाग पाडतात आणि मग या आठवणींच्या रंगमहालात बाजारात आपण स्वतःलाही हरवून बसतो. 'काकस्पर्श' ही कविता अध्यात्मिकतेच्या धाग्यात गुंफलेल्या नात्यांमधील गुंतागुंतीच्या वीणेचे प्रगट केलेले सहज सुंदर वर्णन होय. 'मला वाचवा' या कवितेतून एकाचवेळी उद्बोधक आणि अत्यंत रंजक ही श्रेष्ठ काव्याची लक्षणे त्यांच्या काव्यरचनेतून आहेत. कवयित्रीला जसे दिसते तशी कविता प्रगट होते. ‘घरी गंगा काशी’ या कवितेत लोकं अध्यात्मिकतेचा बुरखा पांघरून अंधश्रद्धेला कसे बळी पडतात हे या कवितेतून सांगितलेले आहे. गंगास्नान करण्यासाठी एवढी जीवित हानी होत असेल तर आपण पुण्यवान होऊ शकतो का? हा एक प्रश्न वाचकांपर्यंत विचारलेला आहे.

***'तीर्थक्षेत्र आहे घरी, आई***
***बाबा चरणांशी***
***सेवा करा वार्धक्यात, माय***
***गंगा बाबा काशी'*** किती सुंदर.




'फूला जपुन' या कवितेतून निसर्गातील रंगछटा कवयित्रीने उत्तम रेखाटलेल्या आहे. पर्जन्य सरी मनाला पुलकित करतात. पण रौद्ररूप धारण केले की ते सशासारखे नाजूक मन घाबरू लागते. हे 'आभाळ फाटलं' या कवितेतून कवयत्रिने हृदयस्पर्शी वर्णन रेखाटले. 'बैलाची आर्त हाक' या कवितेतून समाजातील काही कटू अनुभवाने कवयित्रीचे मन विदीर्ण झाले दिसते. कविता वाचताना नकळत डोळ्यात अश्रू येतात. निसर्ग संवर्धनाचा हृदयस्पर्शी संदेश ‘घरटे देता का कुणी’ या कवितेतून सांगितलेला आहे. 'वटसावित्री पौर्णिमा' या कवितेतील खालील ओळी ***‘योग वडाखाली करू, मिळे प्राणवायू शुद्ध, होई फुफ्फुस सशक्त, होऊ नये कधी वृद्ध.’***

किती चांगला उपयोग आहे वडाच्या झाडाचा. परंतु त्याचा उपयोग फक्त वटपौर्णिमेला, अंधश्रद्धेने धागा बांधून करतात. त्यामुळे कवयित्री दुःखी होते. त्याचप्रमाणे पहलगामचे भ्याड हल्ल्यावर आधारित 'लाल पहाडी' या कवितेतून घडलेल्या घटनेचे सविस्तर वर्णन रेखाटलेले आहे. मातृभाषेचा अभिमान सांगणारे 'माय मराठी' कविता वाचनीय आहे. तीन वर्षातून येणाऱ्या अधिक मासाचे सुरेख वर्णन 'अधिकमास' या कवितेतून केलेले आहे. ‘गुरु पूर्वी व आज’ हा प्रश्न आहे. नीतीमतेच्या पलीकडे गुरु पोहोचल्यामुळे मुलींवर होणारे अत्याचार खूप विचार करणारे आहे. कवयित्रीने आपल्या सासुबाईंवर सुद्धा सुरेख कविता लिहिलेली आहे. त्यात त्यांनी आपल्या सासुबाईचे महती' प्रेमाची कला' या कवितेतून प्रगट केलेली आहे. 'गौतम वाणी' या कवितेतून जीवनातील सत्य उल गडलेले आहे.

***‘उलगडे मृत्यू सत्य गौतमाला फिरताना***
***दुःखी मनी राजपुत्र पुत्र भुला सोडताना’***

यज्ञाचे वास्तव या कवितेतून मोनिका, निर्भया, मालेगाव यांच्यावरती घडलेल्या कटू प्रसंगांचs वर्णन केलेल्या आहे.

‘मेणबत्ती जाळु नयेफुले नको श्रद्धांजली
फाशी द्यावी मैदानात हीच खरी तिलांजली’

आणि हेच आवश्यक आहे.

आपण दिवाळीला दिवे लावतो. परंतु सैनिकासाठी दिवा लावावा असे अतिशय सुरेख विचार प्रगट करणारे 'दिवा दिवाळीचा' ही कविता आहे. कवयित्रीच्या प्रत्येक कवितेचा शेवट हा चिंतन करायला भाग पाडतो. ‘आयुष्याची पहाट’ या कवितेतून पन्नाशी नंतर आनंदाने कसे जगायचे हे सांगितलेले आहे. अशा एकापेक्षा एक असलेल्या भावपूर्ण आणि अभ्यासपूर्ण कवितांचा हा अनुशील काव्यवाट हा संग्रह होय. स्त्रियांना जागृतीचे भान देणारी आपल्या रूढी परंपरांमध्ये काळानुरूप बदल करावा अशा अपेक्षा असलेल काव्यसंग्रह. समाजात घडणाऱ्या बऱ्या वाईट घटनांचे प्रतिबिंब डॉ. शील यांच्या कवितेतून दिसून येते. डॉ. शील यांच्या काही कविता व्यक्तिचित्रणाच्या आहेत. रमा रानडे, सावित्रीचे मोल, नारीरत्न मेघा बसंत, विरंगणा, नवदुर्ग स्त्रिया या श्रीरत्नांवर आधारित कविता वाचून अभ्यासपूर्ण चिंतनाने मन कौतुक करण्यास सज्ज होते. स्त्री कडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहिले जाते याविषयीची खंत 'अशी असली पाहिजे स्त्री' या कवितेतून व्यक्त केलेली आहे. नैतिकतेचा ऱ्हास आणि मूल्यांची पायमल्ली याचाही मार्मिक वेध घेणाऱ्या या कविता आहेत. छत्रपती शिवाजी, ही कविता अनुकरण करण्यायोग्य आहे यातील काही कविता नातेसंबंधाचा प्रवाह नितळ आणि स्वच्छ ठेवण्यासाठी यात असलेली अर्थपूर्ण चिंतनशीलता महत्त्वाची ठरते. 'नणंद आली घरी'' आज समाज जीवनातील वास्तव चित्र रेखाटलेले आहे. मुलगी सासरी गेली की तिचे माहेरचे अस्तित्व नाहीसे होते हे सत्य वर्णन केलेले आहे. 'मला वाचवा' या कवितेतून लिखाणच नव्हे तर खळखळणारे तरल मनाने घेतलेल्या सभोवतांचा परिसराचा घेणारी 'नवरंगाचे महत्त्व' या कवितेत सर्व रंगांचा उल्लेख ..तोही निसर्गाशी जोडलेला आहे. निसर्गातील रंगछटा कवयित्रीने उत्तम रेखाटल्या आहे. 'घरी गंगा काशी ' ही कविता अनुभवातून लिहिलेली आहे. कवयित्रीची कवितासृष्टी ही चैतन्यमय आहे. त्यांच्या संवेदनशील मनाला दिलेली चिंतनाची जोड, जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन प्रगल्भ गेल्याचे जाणवते. 'जे न देखे रवी ते देखे कवी' म्हणतात. कवीला अलौकिक प्रतिभेची देणगी लाभलेली आहे आणि यातूनच आपल्या अनुभवाचे दालन समृद्ध आणि संपन्न करीत आहे. अशी ही कवयित्री डॉ. शील बागडे होय. आयुष्य जगत असताना बाईपणाची चौकट, तिचे भोग, स्त्री सुलभ भावना प्रगट केल्या आहेत. समारंभाची महती वर्णन करणाऱ्या कविता, 'स्त्री म्हणून जगू द्या' 'कोजागिरी पौर्णिमा' या कविता आहेत. कवयित्रीला पर्यावरणाच्या ऱ्हासाबद्दल कळवळा आहे. आभाळ फाटलं या कवितेतून बळीराजाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी कविता आहे. डॉ शील बागडे यांच्या पुढील कविता अधिक प्रगल्भ व अधिक मोहक रूप धारण करून आपल्यासमोर येतील ही अपेक्षा. तसेच साहित्य सेवेत सतत भर पडत राहो, ही अपेक्षा. त्यांच्या कविता नात्यांच्या नाजूक धाग्यांना गुंफत नात्यांची विण जणू घट्ट करत, ओघवतेपण आहे.

भावनांचा संवाद आहे. 'अंगणात पक्षी गाणं' या कवितेत पक्षांचे सूर गवसलेले आहे. 'मुले देवाघरची फुले,'' दिस शाळेचा पहिला' या कविता सकारात्मकता पेरणाऱ्या, आनंदाची बाग फुलवणाऱ्या आहे. 'भाऊबीज' या कवितेत बहिण भावाच्या प्रेमाचे वर्णन चपलकपणे केलेले आहे. आयुष्याच्या वाटेवरून चालताना सुखदुःखाची डोंगर घाट पालथे घालत जीवनाच्या रांगोळीत विविध रंगाची उधळण लेखणीतून होत गेली, वाट सापडत गेली. माणसे भेटत गेली. अनुभवांचे दालन समृद्ध झाले आणि सुरेख कवितांचे भांडार उघडले. मातृदेवो भव, पितृ देव भव या आपल्या संस्कृतीचा आदर, सन्मान डॉ. शीलच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होय. संसारिक जीवन जगत असताना चिंतन करण्याची सवय असल्याने सर्व कवितांना अनुभूतीचे कोंदण लाभलेले आहे आणि हा 76 कवितांचा पुष्पगुच्छ निश्चितच वाचनीय आहे. सर्वांनी कवितासंग्रह वाचनाचा आस्वाद घ्यावा आणि परत डॉ. शील बागडे यांना शुभेच्छा देते.●●



प्रणोती कळमकर
मो. 9834209457

28 June 2026 page 04_Layout 1 6/27/2026 7:49 PM Page 1



## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १८७

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा चाळीसगाव जिल्हा जळगाव



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची स्थापना दि. १४ एप्रिल १९६१ करण्यात आली. नंतर अलिकडे जुलै २०२१ मध्ये त्याचे नुतनीकरण करण्यात आले आहे. चाळीसगाव हे जळगाव जिल्ह्यातील महत्वाचे आहे. येथे विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. पुतळ्याची खाली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्ती ठेवलेल्या आहेत. हे अत्यंत महत्वाचे ठिकाण आहे

संवाद मित्र
प्रा. गौतम निकम
9423915510

## राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती साजरी

# शाहू महाराजांच्या समतावादी विचारांचा वारसा पुढे नेण्याचे गरज : डॉ. संजय शेंडे

**नागपूर :** प्रज्ञा बुद्ध विहार, बौद्ध महिला विकास मंडळ, जवाहर नगर आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आरक्षणाचे जनक राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम रघोजी नगर येथील प्रज्ञा बुद्ध विहार परिसरात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाला माजी नगरसेवक अभय गोटेकर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय शेंडे, महा. अंनिसचे कार्याध्यक्ष डॉ. सुनील भगत तसेच बहुजन सौरभच्या निवासी संपादक व महा. अंनिसच्या अध्यक्षा प्रा. संध्या राजुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. संध्या राजुरकर होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सुनील भगत यांनी प्रास्ताविकातून शाहू महाराजांच्या सामाजिक न्याय, शिक्षण आणि समतेच्या कार्याचा आढावा घेतला. डॉ. संजय शेंडे यांनी शाहू महाराजांनी दिलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. देवयानी भगत आणि सुषमा शेवडे यांनी शाहू महाराजांच्या कार्यावर आधारित प्रेरणादायी पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. राजेश चिकाटे यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून संविधानिक मूल्यांचा संदेश दिला. शोभा गौतम पाटील यांनी सादर केलेल्या 'माता जिजाऊ' या नाट्यविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. यावेळी ॲड. डॉ. सिद्धार्थ कांबळे (मुख्य संपादक, दैनिक बहुजन सौरभ), डॉ. विनोद गजघाटे (मधुरांगण डिमेन्शिया वृद्धाश्रम, नागपूर) तसेच महा अंनिसचे रामभाऊ डोंगरे यांनी शाहू महाराजांच्या कार्याचा आजच्या काळातील संदर्भ स्पष्ट केला. अध्यक्षीय भाषणात प्रा. संध्या राजुरकर यांनी शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य स्मरणात ठेवून महिलांच्या शिक्षणाचा आणि सामाजिक सक्षमीकरणाचा प्रसार करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. विशाखा मेश्राम यांनी केले.उमेश चित्ते यांनी आभार मानले. याप्रसंगी विजया श्रीखंडे, डॉ. विकास होले, सुषमा होले, विभूतीचंद्र गजभिये, प्रीती नगरारे, वसंत मोहिले, प्रबोध मेश्राम तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रज्ञा बुद्ध विहारचे सदस्य उषा मंडपे, कल्पना गायमुखे, साधना दिवे, मंडपे , पिल्लेवान, सविता मेंढे, सुषमा दाभाडे, गिरीश वैरागडे, पुरूषोत्तम नगरारे, संगीता नगरारे, रमेश लोखंडे, सुनीता रामटेके, संगीता वाहने, फुलझेले तसेच परिसरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून शाहू महाराजांना अभिवादन केले.



## 'अरुण विघ्ने' यांना 'राजर्षी शाहू महाराज पुरस्कार' प्रदान



**वर्धा :** महाराष्ट्रातील ज्येष्ठ मराठी व आंबेडकरी कवी, गझलकार, समीक्षक तसेच सेवानिवृत्त शिक्षक अरुण हरिभाऊ विघ्ने (रोहणा) यांना त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक योगदानाबद्दल 'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. अश्वघोष कला व सांस्कृतिक मंच, वर्धा यांच्यावतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय बुद्ध-भीम गीत गायन स्पर्धेच्या समारंभात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ आणि पंचशील दुपट्टा असे होते. यावेळी इंजि. नरेंद्र ताकसांडे, सविता ताकसांडे, मंचाचे अध्यक्ष धनंजय नाखले, नलिनी नाखले, राजू थूल, प्राचार्य मुन्ना नाखले आणि अर्चना नाखले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अरुण विघ्ने यांनी कविता, गझल, समीक्षा आणि आंबेडकरी साहित्याच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचे कार्य सातत्याने केले आहे. त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक योगदानाची दखल घेऊन त्यांना हा राज्यस्तरीय सन्मान प्रदान करण्यात आला. । पुरस्काराबद्दल प्रशांत ढोले, संजय मोडक, प्रकाश जिंदे, डॉ. मिरगे, संजय ओरके, धम्मा कांबळे, प्राचार्य अरविंद पाटील तसेच विविध साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते आणि चाहत्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## महत्वाचे



## प्रवीण बागडे यांना राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार

**नागपूर :** निळे प्रतिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आयोजित राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार-२०२६ सोहळा तसेच दैनिक निळे प्रतिकच्या १७ व्या वर्धापन दिन आणि राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त आयोजित भव्य कार्यक्रमात ज्येष्ठ लेखक, कवी व सामाजिक विश्लेषक प्रवीण बागडे (नागपूर) यांना राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र सभागृह, छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात बुद्धिस्ट उद्योजक गोल्डमॅन रोहित पिसाळ यांच्या हस्ते प्रवीण बागडे यांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र तसेच राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या टाळ्यांच्या गजरात त्यांचा गौरव करण्यात आला. पत्रकारिता, साहित्य, सामाजिक प्रबोधन, संविधानिक मूल्यांचा प्रचार-प्रसार तसेच समाजहितासाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन प्रवीण बागडे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर सोमकुवर, सामाजिक कार्यकर्त्या ज्योती सिंगारे यांच्यासह विविध क्षेत्रांतील एकूण २० मान्यवरांचा गौरव करून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन रतनकुमार साळवे, मुख्य संपादक, दैनिक निळे प्रतिक यांनी केले होते. कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, साहित्यिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल आयोजकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले.

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी नागपुरात धरणे आंदोलन; सामाजिक न्याय दिनी शाहू महाराजांना अभिवादन

**नागपूर :** सामाजिक न्याय दिन तथा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त नागपूरच्या संविधान चौकात दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, विदर्भ प्रदेश, समता सैनिक दल तसेच विविध सहयोगी सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच महाबोधी महाविहार मुक्तीच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करण्यात आली.



बुद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला ५०० दिवस पूर्ण झाल्याच्या निमित्ताने देशभरात विविध ठिकाणी एकदिवसीय धरणे आंदोलने व स्थानिक प्रशासनामार्फत केंद्र शासनाला निवेदने सादर करण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणून नागपूर येथेही संविधान चौकात आंदोलन करून महाबोधी महाविहाराची मुक्तता करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनाला भदंत नागदिपंकर महास्थवीर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी अनिल कुमार मेश्राम, राजकुमार वंजारी, मिलिंद डांगे, हरिदास बेलेकर, जासुंद पाटील, हरिदास नागदेवे, ए. आर. मेश्राम, रुपदास गेडाम, रेखा नितनवरे, कल्पना बनकर, सी. टी. जांगळे, गोपीचंद अंभोरे, डॉ. बी. पी. कोचे, मानव वंजारी, चंद्रभान भोवते, ज्ञानेश्वर शेंडे, प्रसेनजित गायकवाड, रमाताई वासनिक, रमेश ढवळे, मनोहरराव दुपारे, ॲड. सुशिला गायकवाड, राकेश धारगावे, कृष्णा बोरकर, पौर्णिमा मेश्राम, भीमराव मेश्राम, संजय पाटील, विनोद गजभिये, सुनंदा ढवळे, नरेश मेश्राम, उषा मेश्राम, उज्ज्वला थुल, संध्या नानवटे तसेच भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल आणि इतर सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौद्ध समाजाकडे सोपविण्याची मागणी करण्यात आली. तसेच बौद्ध धर्मीयांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी केंद्र शासनाने तातडीने हस्तक्षेप करून महाबोधी महाविहार मुक्तीचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी सामाजिक न्याय, समता आणि संविधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी तसेच महाबोधी महाविहार मुक्तीसाठी लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

## समता सैनिक दलातर्फे राष्ट्रपती व प्रधानमंत्रींच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन



**नागपूर :** समता सैनिक दलाच्या प्रतिनिधी मंडळाने आज भारताच्या महामहिम राष्ट्रपती तथा प्रधानमंत्री यांच्या नावे नागपूर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महत्त्वपूर्ण निवेदन (मेमोरँडम) सादर केले. देशातील विद्यार्थी, बौद्ध समाज आणि अनुसूचित जातींच्या हक्कांशी संबंधित तीन महत्त्वाच्या विषयांवर केंद्र शासनाचे तातडीने लक्ष वेधून आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली. निवेदनातील पहिला मुद्दा नीट-यूजी (NEET-UG) परीक्षा पेपरफुटी प्रकरणाशी संबंधित असून या प्रकरणाची केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (CBI) सखोल चौकशी करण्यात यावी, दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी कोणतीही तडजोड होऊ नये, अशी मागणी करण्यात आली.

दुसरा मुद्दा कल्याण-डोंबिवली येथे त. भगवान बुद्धांच्या मूर्ती व बौद्ध स्मारकांच्या पाडकामाबाबतचा आहे. कोणतीही कायदेशीर पूर्वसूचना न देता करण्यात आलेल्या या कारवाईचा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डी. एफ. कोचे, मुख्य कार्य मार्गदर्शक भदंत नाग दिपांकर, राष्ट्रीय जो-ओशी डॉ. प्रदीप डोंगरे आणि महासचिव एम. आर. राऊत यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. नुकसान झालेल्या बुद्धमूर्तींची त्याच ठिकाणी सन्मानपूर्वक पुनर्स्थापना करण्यात यावी तसेच या घटनेस जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली.

तिसरा मुद्दा अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण (Sub-Categorisation) या निर्णयाच्या विरोधासंदर्भात असून हा निर्णय सामाजिक न्याय, समानता आणि भारतीय संविधानाच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात असल्याचे समता सैनिक दलाने नमूद केले आहे. केंद्र शासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करून उपवर्गीकरणाचे धोरण मागे घ्यावे, अशी मागणी करण्यात आली. समता सैनिक दलाने स्पष्ट केले की, हे तीनही विषय देशातील कोट्यवधी विद्यार्थी, बौद्ध समाज आणि अनुसूचित जातींच्या अधिकार, सन्मान व भविष्याशी निगडित असल्याने केंद्र शासनाने तातडीने सकारात्मक हस्तक्षेप करून न्याय द्यावा. यावेळी अतिरिक्त महासचिव अमर दीपांकर, ट्रेनिंग चीफ संघप्रिय नाग (लाडे), कबीर नगर शाखा प्रभारी उरकडा अढाले, मयूर नगर शाखा प्रभारी चंद्रप्रकाश देशभ्रतार तसेच समता सैनिक दलाचे अन्य सैनिक व पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी समता सैनिक दलाने संविधान, सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी संघटना कटिबद्ध असून या विषयांवर पुढेही लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवणार असल्याचा निर्धार व्यक्त केला.



## महात्मा फुले शिक्षण संस्थेत छ. शाहू महाराज जयंती साजरी

**नागपूर :** महात्मा फुले शिक्षण संस्था, रेशीमबाग, नागपूर येथे सामाजिक न्यायाचे प्रणेते व आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी केली. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष गुलाब चिचाटे व सहचिटणीस रमेश राऊत यांनी क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच संस्थेचे सरचिटणीस रवींद्र अंबांडकर यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. उपस्थितांनीही शाहू महाराजांच्या सामाजिक समता, शिक्षण व लोककल्याणाच्या कार्याला आदरांजली वाहिली. या कार्यक्रमाला थोर महापुरुषांची जयंती /स्मृतिदिन समारोह समितीचे संयोजक राजेंद्र पाटील, सहसंयोजक प्रा.डॉ.अभिजित पोतले, संचालक देवेंद्र काटे, प्रा.पंकज कुरळकर तसेच संस्थेचे कर्मचारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑरेंज सिटी समाजकार्य महाविद्यालय नागपूर येथे सामाजिक न्याय दिन व कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांचा सहकुटुंब सत्कार सोहळा

**नागपूर :** ऑरेंज सिटी समाजकार्य महाविद्यालय नागपूर येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती - सामाजिक न्याय दिन व कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांचा सहकुटुंब सत्कार सोहळा अध्यक्ष डॉ. केदारसिंह रोटेले यांचे मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांच्या नेतृत्वात उत्साहात झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक प्रा. संध्या राजूरकर व अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मुरलीधर मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात लोकराजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज व संस्थापक अध्यक्ष स्मृतीशेष डॉ. चंदनसिंह रोटेले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचनाने करण्यात आली. याप्रसंगी 'नशा मुक्ती सप्ताह' अंतर्गत नशा मुक्त नागपूर करण्याकरिता सामूहिक शपथ घेण्यात आली. इयत्ता १० वी आणि १२ वी च्या परीक्षेत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना या प्रसंगी शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन प्रमुख अतिथींचे हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथी प्रा. संध्या राजूरकर यांनी 'यशाला शॉर्टकट नाही आणि परिश्रमाला पर्याय नाही' असा मोलाचा संदेश देत महाविद्यालयाच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे कौतुक केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांनी 'उज्वल भविष्याकडे झेप घेताना कुणीही सामाजिक भान विसरु नये' असे दिशादर्शक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. यानिमित्ताने सन्मानार्थी विद्यार्थीनी अक्षता रहांगडाले व जान्हवी झोड यांनी आपले मनोगत व्यक्त करीत महाविद्यालयाचे आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन व आभार डॉ. शालिनी तोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयक्यूएसी समन्वयक प्रा. कल्पना मुकुंदे, प्रा. दीपरत्न राऊत, डॉ. कल्पना जामगडे, डॉ. विजय तुपे, डॉ. रचना धडाडे, डॉ. सुलोक रघुवंशी, डॉ. व्यंकटी नागरगोजे, डॉ. कविता कान्होलकर, जयंत कोसनकर, राजीव काथवटे, उल्हास निखाडे, शरदसिंह बैस, निलेश बोबडे, रश्मी चांदुरकर, मनोज साखरकर, भोलानाथ तळेकर, सदाशिव गायकवाड, शारदा गिरी, धीरज रोटेले, मालती तुपे, गोकुल आष्टणकर, अनिता चतुर व सतीश भराडे यांनी अथक परिश्रम घेतले.



## राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा भारत घडविण्यासाठी सामाजिक न्यायाची भूमिका बळकट करावी : अशोक सरस्वती बौद्ध



**बैतूल :** जिल्हा बामसेफच्या वतीने बैतूल येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाच्या विचारांवर भर देण्यात आला. या कार्यक्रमात बुद्ध विहार समन्वय समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक सरस्वती बौद्ध यांनी अध्यक्षीय भाषण केले. अशोक सरस्वती बौद्ध यांनी आपल्या भाषणात सांगितले की, राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांची प्रभावी अंमलबजावणी केली. सक्तीचे शिक्षण, जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध आदेश, वंचित समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे तसेच प्रशासनात आरक्षण यांसारख्या निर्णयांमुळे त्यांनी सामाजिक परिवर्तनाची भक्कम पायाभरणी केली. शाहू महाराजांच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या धोरणांवर टीका करत, अशा विचारसरणीला लोकशाही मार्गाने पराभूत करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. रविंद्र मुंद्रे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी शाहू महाराजांच्या जयंतीचे कार्यक्रम हे केवळ औपचारिक न राहता समाजात वैचारिक क्रांती घडविण्याचे माध्यम ठरले पाहिजेत, असे मत व्यक्त केले. त्यांनी नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणावर टीका करत, विवेकशील नागरिक घडविणाऱ्या शिक्षणाची आवश्यकता अधोरेखित केली. कार्यक्रमात के. पी. बकोरिया, डॉ. रमण मालवीय, विश्वनाथ वाघ, विजयकुमार पांचाल, विजय काके आणि संदीप सपकाळे यांनीही मनोगते व्यक्त केली. सारणी येथील वाईकर तसेच जिल्हा बसपा अध्यक्ष पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगदीशकुमार हूरमाळे यांनी केले, संचालन बी. के. खातरकर यांनी केले, तर स्नेहलता चौकीवर यांनी आभार मानले.

## चेतना शिक्षण महाविद्यालयात दलाई लामा यांच्या जीवना वरील छायाचित्र प्रदर्शन



**वर्धा :** चेतना शिक्षण महाविद्यालय, सावंगी (मेघे) येथील सावित्रीबाई फुले सभागृहात दलाई लामा यांच्या जीवन आणि कर्तृत्वावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन केले होते. निर्वासित तिबेट सरकार, धर्मशाळा (हिमाचल प्रदेश) यांच्या वतीने आयोजित या प्रदर्शनात दलाई लामा यांच्या जीवनप्रवास, बौद्ध संस्कृती आणि शांततेच्या संदेशावर आधारित दुर्मीळ छायाचित्रे प्रदर्शित केली आहेत. कार्यक्रमाला गोठणगाव (जि. गोंदिया) येथील तिबेटी वसाहतीचे प्रमुख उपस्थित होते , आंबेडकरी व सामाजिक कार्यकर्त्या चेतना सवाई यांच्या अध्यक्षतेखाली झाली या प्रदर्शनास विद्यार्थी, महिला, बौद्ध उपासक-उपासिका, भीमसैनिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे विदर्भ व जिल्हाध्यक्ष महेंद्र मुनेश्वर यांनी केले आहे.

## महाकारुणिक बुद्ध विहारात भदंत एन. बोधिरत्न नायक महाथेरो यांना आदरांजली



**नागपूर :** महाकारुणिक बुद्ध विहार, जुनी अजनी येथे परमपूज्य भदंत एन. बोधिरत्न नायक महाथेरो यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ विहाराच्या विश्वस्त मंडळाच्यावतीने भावपूर्ण आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले. धम्मप्रसारासाठी आयुष्यभर समर्पित राहिलेल्या भदंतजींच्या कार्याचा यावेळी उपस्थितांनी कृतज्ञतेने गौरव केला.आदरांजली सभेत वक्त्यांनी सांगितले की, परमपूज्य भदंत एन. बोधिरत्न नायक महाथेरो हे केवळ नागपूरचेच नव्हे, तर संपूर्ण बौद्ध धम्मचळवळीचे प्रेरणादायी नेतृत्व होते. बाल्यावस्थेपासून त्यांचे महाकारुणिक बुद्ध विहाराशी अतूट नाते होते. त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण धम्मदेशनांद्वारे, प्रभावी वक्तृत्वातून आणि करुणामय व्यक्तिमत्त्वातून हजारो उपासक-उपासिकांच्या जीवनात धम्मसंस्कार रुजविले. धम्मप्रसारासाठी त्यांनी केलेले अथक परिश्रम, धम्माप्रती असलेली अढळ निष्ठा आणि समाजपरिवर्तनासाठी केलेले समर्पित कार्य भावी पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहील, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. भदंतजींच्या अकस्मात परिनिर्वाणामुळे धम्मविश्वाने एक तेजस्वी धम्मगुरू, समाजाने एक करुणामय मार्गदर्शक आणि युवा भिक्खू पिढीने एक आदर्श गुरु गमावल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही, अशा शब्दांत उपस्थितांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी यशोधरा महिला मंडळ आणि युवा मंडळाने विशेष परिश्रम घेतले. यावेळी पद्मा पाटील, सरस्वती हाडके, रजनी सुखदेवे, शुभांगी पाटील, अंजू पाटील, कमुना हाडके, वैशाली हाडके, देवका पाटील, अजय गणवीर, रॉबिन वासे, श्लोक हाडके, हिमांशु हाडके, सुमित हाडके, श्रेयस पाटील आणि पराग थूल यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक किशोर पाटील यांनी केले, तर संचालन आनंद पाटील यांनी केले. शेवटी उपस्थितांनी भदंत एन. बोधिरत्न नायक महाथेरो यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून दोन मिनिटे मौन पाळत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

## बसपातर्फे बाईक रॅलीने शाहू जयंती साजरी



**नागपूर :** बहुजन समाज पार्टीतर्फे आरक्षणाचे जनक बहुजन राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती दक्षिण नागपुरातून भव्य बाईक रॅली काढून उत्साहात साजरी करण्यात आली. 'कहीं हम भूल न जाएँ' या बसपाच्या राष्ट्रीय अभियानांतर्गत आयोजित या कार्यक्रमात शाहू महाराजांचे सामाजिक न्याय व आरक्षण धोरण शासनाने प्रभावीपणे राबवावे, अशी मागणी केली. त्रिशरण चौकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून शहराध्यक्ष अनिकेत कुत्तरमारे यांच्या नेतृत्वात, उत्तम शेवडे, रंजना ढोरे व सहदेव पिल्लेवान यांच्या मार्गदर्शनाखाली बाईक रॅली काढण्यात आली. दक्षिण, मध्य व दक्षिण-पश्चिम नागपुरातील प्रमुख भागातून रॅली मेडिकल चौकात पोहोचल्यानंतर तेथे जयंती सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पृथ्वीराज शेंडे होते. यावेळी चंद्रशेखर कांबळे, संजय इखार, सौरभ जामगडे, पंकज नाखले, मनोज निकाळजे, अभिलेश वाहने, प्रवीण पाटील, दिलीप रामटेके, सचिन मानवटकर, संजय जयस्वाल, गौतम पाटील, शशिकांत मेश्राम, इंजि. भीमराव गजभिये, संगीतबाबू इंगळे, रंजना घरडे आणि मंगेश नागदेवे यांनी मनोगत व्यक्त केले. सन २००२ मध्ये मेडिकल चौकात राजर्षी शाहू महाराजांचे स्मारक उभारण्याचा महापालिकेचा ठराव मंजूर होऊनही तो अद्याप पूर्ण झालेला नसल्याबद्दल यावेळी नाराजी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहदेव पिल्लेवान, संचालन नितीन वंजारी यांनी केले, तर समारोप सुरेंद्र डोंगरे यांनी केला. रॅली व जयंती सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी शुभम पिल्लेवान, सिद्धार्थ बनसोड, स्वप्नील ढवळे, सुमित जांभुळकर, सदानंद जामगडे, डॉ. सरोज गजभिये, विलास सोमकुवर, बालचंद्र जगताप, संबोधी सांगोळे, प्रेम पाटील, सुधाकर रंगारी, संभाजी लोखंडे, रमाताई इंगळे, विमल वराडे, सविता बागडे, भीमराव गोडघाटे, विकास डोंगरे, प्रफुल फुलमाडी, हेमंत बोरकर, महावीर मेश्राम, रमेश निकोसे, खुशाल थुल, राष्ट्रपाल पाटील, गजानन मेश्राम, किशोर बनसोड, सुरज बोरकर, सौरभ गाणार, भानुदास ढोरे, सोमेश्वर खोब्रागडे, वासुदेव मेश्राम, अरुण शेवडे, अश्विन कांबळे, प्रफुल पाटील, उत्तम चव्हाण, जगदीश गेडाम, किरण गौरखेडे आणि आदेश रामटेके यांनी विशेष सहकार्य केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648